दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-९० | शनिवार दि.२० जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### शांततेचा करार की तात्पुरती विश्रांती ?

पश्चिम आशियातील युद्धाच्या ज्वाळांनी गेल्या काही महिन्यांपासून संपूर्ण जगाला अस्वस्थ केले होते. जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजारपेठ, सागरी व्यापार आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यावर या संघर्षाचे दूरगामी परिणाम होत होते. अशा परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यात झालेला शांतता करार हा निश्चितच दिलासादायक आणि स्वागतार्ह घटनाक्रम आहे. मात्र, या कराराकडे केवळ युद्धसमाप्तीच्या दृष्टिकोनातून पाहणे पुरेसे ठरणार नाही.

# गाळमुक्त धरण योजनेला १२५ कोटींचे बळ!

मुंबई । प्रतिनिधी

**गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेंतर्गत राज्यातील जलसाठ्यांमधून गाळ काढण्याच्या कामांना मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या योजनांअंतर्गत अशासकीय संस्था, स्वयंसेवी संघटना आणि शेतकऱ्यांना देय असलेली प्रलंबित देयके अदा करण्यासाठी तब्बल १२५ कोटी ८४ लाख ८१ हजार ५१ रुपयांच्या निधीच्या वितरणास शासनाने मान्यता दिली आहे. यामुळे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पूर्ण झालेल्या गाळ काढण्याच्या कामांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



## संस्था व शेतकऱ्यांना दिलासा

या निधीतून जलसाठ्यांमधील गाळ काढणाऱ्या अशासकीय संस्थांना देयके दिली जाणार असून, गाळ आपल्या शेतात नेऊन पसरविणाऱ्या पात्र शेतकऱ्यांनाही अनुदान मिळणार आहे. जलसंधारण विभागामार्फत हा निधी तात्काळ संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार आहे. शासनाने निधी वितरणासाठी कठोर अटी व निकष निश्चित केले आहेत. कामांचे मोजमाप, जिओ-टॅगिंग, छायाचित्रे, अवनी ॲपवरील माहिती यांची पडताळणी केल्यानंतरच संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने निधी वितरित केला जाणार आहे. विशेष म्हणजे, ज्या अशासकीय किंवा स्वयंसेवी संस्थांना एक कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी मिळणार आहे, त्यांच्या कामांची जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र पडताळणी ▶▶ पान २ वर

# 'तुम्हाला मुलं होत नाहीत तर आमची का पळवता'

## उद्धव ठाकरे यांचा विरोधकांवर घणाघात

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेनेचे (ठाकरे) सहा खासदार फोडून शिंदे गटात जाणार असल्याची चर्चा आहे. याला 'ऑपरेशन टायगर' असे नाव दिल्याचे बोलले जात आहे. यावर उद्धव ठाकरे यांनी सडकून टीका केली. ''ज्या पद्धतीने देशाचे राजकारण चालले आहे जनतेचा विश्वास उडत चालला आहे. सोशल मीडियावर एक मिम व्हायरल होत आहे. सोने चोराला



पोलिसांनी पकडल्यानंतर तो सांगतो साहेब चोरी म्हणू नका, 'ऑपरेशन गोल्ड' म्हणा. डॉक्टरही आता गोंधळलेत की आपण चोरी करतोय की ऑपरेशन करतोय. हे असे होणार असेल तर तुम्हाला आणि आपल्याला सगळ्यांना मिळून 'ऑपरेशन कमळ' कराव लागेल. देश अराजकाच्या दिशेने चालला आहे'', असा संताप उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला. यावेळी ''तुम्हाला मुलं होत नाहीत तर ▶▶ पान २ वर

# तुम्ही काय तुडवणार, शिवसैनिक तुमचे पाय जागेवर ठेवणार नाहीत-एकनाथ शिंदे

मुंबई । प्रतिनिधी

**रात्री खासदारांना शिव्या द्यायच्या आणि सकाळी कौतुक करायचं, हे असं चालतं का? सेनापतीने घरात बसून चालत नाही, त्याने पुढे येऊन लढावं लागतं. हा एकनाथ शिंदे लढवय्या आहे, कुणावर संकट आलं तर पुढे मी असेन, असं एकनाथ शिंदे म्हणाले. हे काय आम्हाला चॅलेंज देणार. आता म्हणतात तुडवा. हिंमत**



**असेल तर समोर या. तुडवायला पाय लागतात, तुम्ही आला तर हे शिवसैनिक तुमचे पाय जागेवर ठेवतील का? असा इशारा एकनाथ शिंदे यांनी दिला. शिवसेनेचा ६० वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.**

यावेळी एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे कौतुक केलं. त्याचवेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. हा एकनाथ शिंदे तुमच्यावर संकट आलं तर ▶▶ पान २ वर

# मराठा विद्यार्थ्यांची घेतलेली फी परत मिळणार !

## प्रसाद लाड यांचे मनोज जरांगेंना आश्वासन, शासन जिआर काढणार

जालना । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीसंदर्भात शैक्षणिक शुल्क सवलतीबाबत राज्यभरातून तक्रारी येत असताना, भाजप आमदार प्रसाद लाड यांनी मोठे आश्वासन दिले आहे. दोन दिवसांत राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांपर्यंत शासनाचा (शासन निर्णय) पोहोचवला जाईल. ज्या विद्यार्थ्यांकडून फी आकारण्यात आली आहे, त्यांना ती परत मिळेल, असे आश्वासन त्यांनी



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना दिले.

अंतरवली सराटी येथे झालेल्या चर्चेदरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी शासनाच्या आदेशाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सरकारने जिआर काढला असताना शाळा आणि महाविद्यालये १०० टक्के फी कशी घेत आहेत? अधिकाऱ्यांना आदेशांचे पालन करण्यात अडचण काय आहे? शासन फक्त नावालाच जिआर काढते का?'' असा सवाल त्यांनी केला. तसेच, सवलत लागू होण्याआधी विद्यार्थ्यांकडून फी भरून घेतली जात असेल, तर त्या जिआरचा उपयोग काय? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना प्रसाद लाड म्हणाले, ''जे अधिकारी शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करणार नाहीत, त्यांच्यावर ▶▶ पान २ वर

# तुळजाभवानी मंदिरात व्हीआयपी दर्शन बंद सर्वांना आता एकाच रांगेतून जावे लागणार

तुळजापूर । प्रतिनिधी

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तुळजाभवानी मंदिर येथे दर्शन व्यवस्थेत मोठा आणि ऐतिहासिक बदल करण्यात आला आहे. मंदिर संस्थानाने व्हीआयपी आणि सर्वसामान्य भाविकांमधील भेद संपुष्टात आणत सर्वांना एकाच रांगेतून देवीचे दर्शन देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे मंदिरातील दर्शन व्यवस्था अधिक पारदर्शक, सुलभ आणि समान होणार असल्याचे सांगितले जात आहे. मंदिर प्रशासनाच्या नव्या नियमानुसार, यापुढे देणगीदार, व्हीआयपी ▶▶ पान २ वर



# सुभाष चौरे यांना 'आदर्श पत्रकारिता' महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यासाठी 'राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन्स २०२६' पुरस्कारांचे आयोजन करण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी 'राज्य लोकतंत्र'चे कार्यकारी संपादक सुभाष चौरे यांची 'आदर्श पत्रकारिता' क्षेत्रातील योगदानाबद्दल ▶▶ पान २ वर



# जालन्यात पटेल दूध डेअरीवर छापा

## दूध डेअरीवाले दुकानं बंद करून पळाले ?

जालना । प्रतिनिधी

जालन्यात अजीम पटेल यांच्या दूध डेअरीवर छापा टाकण्यात आला आहे. ही कारवाई होताच जालना शहरातील काही दूध डेअरी दुकानदार आपआपली दुकाने बंद करून पळून गेल्याचे निदर्शनास आले.

आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर भेसळयुक्त अन्नपदार्थ विरोधातील कारवाईला मोठा वेग आला असून दूध, दुग्धजन्य पदार्थ तसेच इतर खाद्यपदार्थांमध्ये भेसळ आढळून येत असल्याने राज्यभरात धडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जालना शहरातील दुःखी नगर परिसरातील पटेल दूध डेअरीवर अचानक धडक देऊन ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ऑगस्टनंतर अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई

मुंबई : राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक व ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले असून, १५ ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. परिवहन विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे की, १५ ऑगस्ट २०२६ नंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या अमराठी चालकांवर नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल. सर्व चालकांनी मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन वेळेत प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन सहआयुक्त रवी गायकवाड यांनी केले आहे.

### टेलिग्रामवर २२ जूनपर्यंत बंदी कायम-हायकोर्ट

दिल्ली: इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्म अर्थात टेलिग्रामला दिल्ली उच्च न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. केंद्र सरकारने २२ जूनपर्यंत लागू केलेल्या बंदीविरोधात टेलिग्रामने दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे सध्या तरी भारतात टेलिग्रामवरील निर्बंध कायम राहणार आहेत. २०२६ च्या पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय घेतला होता. सरकारच्या मते, परीक्षेतील गैरप्रकार, पेपरफुटी आणि संघटित फसवणुकीसाठी टेलिग्रामचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. या निर्णयाला टेलिग्रामने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र न्यायमूर्ती तेजस करिया यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारचा निर्णय योग्य असल्याचे म्हटले आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६९ अंतर्गत सरकारला अशा प्रकारची कारवाई करण्याचा अधिकार असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

### महाजनांच्या भेटीनंतर रविकांत तुपकरांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित

बुलढाणा: गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेले अन्नत्याग आंदोलन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी शुक्रवारी (दि.१९ जून) तात्पुरते स्थगित केले. सरसकट, विनाअट कर्जमुक्ती, हक्काचा पीकविमा आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी त्यांचे बुलढाणा येथे आंदोलन सुरु होते. आंदोलनाच्या पाचव्या दिवशी मंत्री गिरीश महाजन यांनी तुपकर यांची आंदोलनस्थळी भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. तुमच्या मागण्यांवर नक्कीच सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन महाजन यांनी दिले. त्यानंतर तुपकर यांनी आंदोलन स्थगित करत असल्याचे जाहीर केले. सरकारला चार ते पाच दिवसांची मुदत देत आहोत. या कालावधीत शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती व पीकविम्याबाबत सकारात्मक निर्णय झाला नाही, तर पुन्हा अधिक ताकदीने आणि मोठ्या जनसमर्थासह रस्त्यावर उतरू. हा संघर्ष थांबलेला नाही, तो शेतकऱ्यांच्या न्यायासाठी सुरुच राहणार आहे, असे तुपकर यांनी म्हटले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१९ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४७.५० क्विंटल | २,३०० | २,५५१ | २,३७७ |
| ज्वारी/हायब्रिड: ४४.०० क्विंटल | २,००१ | ३,२९१ | २,५२७ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : ९.५० क्विंटल | ७,४१५ | ७,४१५ | ७,४१५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,४०२ | २,७९६ | २,५९३ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ४,३०१ | ५,४५० | ५,१०२ |

# १० हून अधिक कर्मचारी असलेल्या संस्थांना पॉश ऑडिट बंधनकारक

## देशातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारचा महत्वपुर्ण निर्णय



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**कामाच्या ठिकाणी महिलांचे शोषण रोखण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देशांची नियमावली जारी केली. यामध्ये शासकीय आणि खासगी अशा दोन्ही क्षेत्रांतील कंपन्यांना दरवर्षी 'पॉश'कायद्याचे ऑडिट करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.**

### जिल्हाधिकाऱ्यांवर थेट जबाबदारी

या कायद्याची तळागाळापर्यंत अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हा अधिकारी' नियुक्त केले जातील. जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांच्यावर कायद्याच्या अंमलबजावणीची थेट जबाबदारी असेल.

### असंघटित क्षेत्रातील महिलांसाठी 'स्थानिक समित्या'

घरकाम करणाऱ्या महिला, लहान दुकानांमधील कर्मचारी किंवा जेथे १० पेक्षा कमी कर्मचारी आहेत अशा असंघटित क्षेत्रातील महिलांच्या तक्रारींसाठी प्रत्येक जिल्ह्यात 'स्थानिक समित्या' सक्षम केल्या जातील. तालुका आणि प्रभागाच्या पातळीवर यासाठी विशेष नोडल अधिकारी असतील.

नाशिक टीसीएस प्रकरणात पॉश कायद्याचे पालन झाले नसल्याचे महिला आयोगाच्या अहवालात निर्दशनास आले होते. यानंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे. या निर्देशांचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महिला आयोगाने दिला. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर ▶▶ पान २ वर



अग्रलेख

# शांततेचा करार की तात्पुरती विश्रांती?

पश्चिम आशियातील युद्धाच्या ज्वाळांनी गेल्या काही महिन्यांपासून संपूर्ण जगाला अस्वस्थ केले होते. जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजारपेठ, सागरी व्यापार आणि आंतरराष्ट्रीय राजकारण यावर या संघर्षाचे दूरगामी परिणाम होत होते. अशा परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यात झालेला शांतता करार हा निश्चितच दिलासादायक आणि स्वागतार्ह घटनाक्रम आहे. मात्र, या कराराकडे केवळ युद्धसमाप्तीच्या दृष्टिकोनातून पाहणे पुरेसे ठरणार नाही. कारण या करारामागील राजकीय वास्तव, आर्थिक हितसंबंध आणि धोरणात्मक गणिते अधिक महत्त्वाची आहेत.

चार महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेल्या संघर्षामुळे जगातील ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली होती. होर्मुझ सामुद्रधुनीवरील तणावामुळे तेलाच्या किमती सातत्याने अस्थिर राहिल्या. जगातील जवळपास एक तृतीयांश तेलवाहतूक या मार्गाने होते. त्यामुळे या मार्गाचे पुनरुज्जीवन हे केवळ अमेरिका किंवा इराणपुरते मर्यादित नसून संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक होते. त्यामुळेच करारानंतर तेलाच्या किमतीत झालेली घसरण ही बाजारपेठेने व्यक्त केलेली सकारात्मक प्रतिक्रिया मानली पाहिजे.

या करारातील आर्थिक अटी विशेष लक्षवेधी आहेत. इराणवरील निर्बंध हटविणे, गोठवलेली मालमत्ता परत देणे आणि पुनर्बांधणीसाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करणे या बाबी इराणसाठी मोठा दिलासा आहेत. दुसरीकडे अमेरिकेलाही मध्यपूर्वेतील अस्थिरतेमुळे निर्माण झालेला राजकीय आणि आर्थिक ताण कमी करण्याची गरज होती. त्यामुळे हा करार दोन्ही देशांच्या राष्ट्रीय हितसंबंधांचा तडजोडीचा मार्ग असल्याचे दिसते. मात्र, या करारामध्ये अनेक विरोधाभासही दडलेले आहेत. एका बाजूला शांततेची घोषणा केली जात असताना दुसऱ्याच दिवशी कराराचे पालन झाले नाही तर पुन्हा बॉम्बहल्ले करण्याची धमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प देतात. अशा वक्तव्यांमुळे शांततेच्या प्रक्रियेबाबत शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. युद्धविराम टिकवून ठेवण्यासाठी विश्वासाची गरज असते; धमक्यांची नव्हे. त्यामुळे हा करार स्थिरतेचा पाया ठरेल की केवळ तात्पुरती विश्रांती ठरेल, याची कसोटी पुढील काही महिन्यांत लागणार आहे.

इराणनेही आपल्या क्षेपणास्त्र कार्यक्रमावर कोणतीही तडजोड नाकारली आहे. युरेनियम प्रश्नावरही पूर्ण स्पष्टता दिसून येत नाही. म्हणजेच संघर्षाची मूळ कारणे अद्याप कायम आहेत. त्यामुळे युद्ध थांबले असले तरी तणाव पूर्णपणे संपला आहे असे म्हणणे धाडसाचे ठरेल. या घडामोडींमध्ये भारताचा संदर्भही महत्त्वाचा ठरतो. भारताच्या ऊर्जा गरजांचा मोठा भाग पश्चिम आशियाशी जोडलेला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी खुली राहणे हे भारतासाठी आर्थिक आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यावश्यक आहे. जी-७ परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेली भूमिका ही भारताच्या दीर्घकालीन सागरी आणि ऊर्जा सुरक्षेच्या धोरणाशी सुसंगत आहे. भारतीय खलाशांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करून भारताने आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांचे भानही दाखवून दिले. डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींच्या नेतृत्वाचे केलेले कौतुक आणि भारताच्या सुरक्षेबाबत दिलेली भूमिका ही राजनैतिकदृष्ट्या महत्त्वाची असली तरी आंतरराष्ट्रीय संबंध हे व्यक्तिपेक्षा राष्ट्रीय हितांवर आधारित असतात, हे विसरून चालणार नाही. त्यामुळे अशा विधानांकडे भावनिक नव्हे तर व्यावहारिक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे.

शांतता करार हा नेहमीच युद्धापेक्षा श्रेष्ठ पर्याय असतो. परंतु इतिहास सांगतो की कागदावरील करार आणि प्रत्यक्षातील शांतता यात मोठे अंतर असू शकते. अमेरिका आणि इराण यांच्यातील अविश्वासाचा दीर्घ इतिहास लक्षात घेतला तर हा करार अंतिम समाधान नसून नव्या संवादाची सुरुवात आहे. जगाला युद्धविरामापेक्षा टिकाऊ शांततेची गरज आहे. त्यासाठी दोन्ही देशांनी संयम, परस्पर विश्वास आणि आंतरराष्ट्रीय बांधिलकी यांना प्राधान्य दिले तरच हा करार इतिहासात शांततेचा मैलाचा दगड ठरेल; अन्यथा तो आणखी एका अपूर्ण आश्वासनाप्रमाणे ठरेल.

## माझी वसुंधरा अभियानात लोकसहभाग वाढविण्यावर भर; हवामान कृती आराखड्याचा नियमित आढावा घ्या

### ना.पंकजाताई मुंडे यांनी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले निर्देश

मुंबई । प्रतिनिधि

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या माझी वसुंधरा अभियान आणि राज्य वातावरणीय बदल कक्षाच्या पुनर्रचनेसंदर्भात आज पर्यावरण वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा घेतला. युवक, विद्यार्थी, महिला आणि सामाजिक प्रभावकांचा (इन्फ्लुएन्सर्स) मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढविण्यावर भर द्यावा. तसेच जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत हवामान कृती आराखड्यांवर नियमित चर्चा व्हावी तसेच मंत्रिमंडळ बैठकीत दरमहा हवामान बदल विषयाचा आढावा घेण्यासंदर्भात पुढाकार घेणार असल्याचे यावेळी श्रीमती मुंडे यांनी सांगितले.



यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, उपसचिव जॉय ठाकूर आदी उपस्थित होते. श्रीमती मुंडे म्हणाल्या की, माझी वसुंधरा अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी 'वसुंधरा रक्षक' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात यावी. या अभियानात युवक, विद्यार्थी, महिला आणि सामाजिक प्रभावकांचा (इन्फ्लुएन्सर्स) मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढविण्यावर भर द्यावा. पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला 'वसुंधरा रक्षक' म्हणून सहभागी करून घ्यावे. तसेच या अभियानात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी सोशल मीडियासारखे स्वतंत्र व्यासपीठ विकसित करण्यात यावे. माझी वसुंधरा स्पर्धेतील मूल्यांकन पद्धत सुधारण्याची आवश्यकता असून मूल्यांकन पद्धतीत लोकसंख्येऐवजी प्रदूषणाचा निकष अधिक महत्त्वाचा असावा. त्यामध्ये नागरिकांनी केलेल्या वृक्षारोपण, पाणी पुनर्वापर, कापडी पिशव्यांचा वापर, सायकलिंग, नैसर्गिक शेती आदी पर्यावरणपूरक उपक्रमांना गुणांकनास प्राधान्य द्यावे. डोंगराळ, ग्रामीण आणि औद्योगिक भागातील स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन गुणांकन प्रणाली विकसित करण्याची गरज श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. नैसर्गिक शेती, रासायनिक खतांचा कमी वापर, मृदासंवर्धन, वृक्षारोपण, धूरमुक्त व धूळमुक्त गावे, पाण्याचा पुनर्वापर आणि अक्षय ऊर्जेचा वापर यांसारख्या बाबींना अभियानात विशेष प्राधान्य देण्याचे निर्देशही श्रीमती मुंडे यांनी दिले. राज्य वातावरणीय बदल कक्षाच्या पुनर्रचनेसंदर्भात स्वतंत्र आणि सक्षम यंत्रणा उभारण्याबाबत यावेळी चर्चा झाली. हवामान बदलाशी संबंधित धोरण आखणी, जनजागृती, प्रकल्प व्यवस्थापन, हवामान कृती आराखड्यांचे मूल्यमापन आणि हवामान वित्तपुरवठा यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यासंदर्भात यावेळी चर्चा झाली. सध्या राज्यातील सात शहरांचे हवामान कृती आराखडे तयार करण्यात आले असून ९ शहरांचे आराखडे तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या धर्तीवर राज्यातील सर्वच शहरांचे हवामान कृती आराखडे तयार करण्यात यावेत, असे निर्देश श्रीमती मुंडे यांनी दिले. हवामान बदल हा भविष्यातील अत्यंत महत्त्वाचा विषय असून यामध्ये राज्यातील सर्वच विभागांशी समन्वय ठेवावा, असेही श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.

## चेक बाऊन्स प्रकरणी आरोपीला ६ महिने जेल; सव्वादोन लाखांच्या दंडाचा दणका!

बीड । प्रतिनिधी

**वाहन कर्जाची थकीत रक्कम फेडण्यासाठी दिलेला धनादेश अनादरित करून न्यायालयाला चकवा देणाऱ्या आरोपी प्रकाश बालासाहेब सोळंके (रा. मोरेवाडी, अंबाजोगाई) याला बीड न्यायालयाने चांगलाच दणका दिला आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून ६ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली असून, २,१८,०००/- रुपये नुकसान भरपाई देण्याचे कडक आदेश दिले आहेत. हा द्रव्यदंड न भरल्यास आरोपीला आणखी ४ महिने अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे.**





आरोपीने २८ सप्टेंबर २०२१ रोजी वाहन खरेदीसाठी २,९०,०००/- रुपयांचे कर्ज घेतले होते, मात्र पुढील काळात त्याने कर्जाचे हप्ते थकवले. फायनान्स कंपनीने थकीत रक्कमेची वारंवार मागणी केल्यानंतर, आरोपीने २९ नोव्हेंबर २०२३ रोजी १,४५,२८०/- रुपयांचा आय.डी.बी.आय. बँकेचा धनादेश दिला. सदर धनादेश बँकेत वटवण्यासाठी टाकला असता, तो 'अकाउंट ब्लॉक्ड' या कारणाने १ डिसेंबर २०२३ रोजी न वटताच परत आला. कायदेशीर नोटीस बजावूनही आरोपीने रक्कम न दिल्याने अखेर या प्रकरणी बीड न्यायालयात संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ११०/२०२४ दाखल करण्यात आला होता. खटल्याच्या सुनावणी दरम्यान आरोपी सतत गैरहजर राहिल्याने न्यायालयाने त्याची गंभीर दखल घेत त्याचा फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ नुसारचा जबाब थेट वगळला. फिर्यादी पक्षातर्फे सादर करण्यात आलेले भक्कम पुरावे आणि कायद्याचा युक्तिवाद न्यायालयाने संपूर्णपणे ग्राह्य धरला. पिठासीन अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांनी १९ जून २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण न्यायनिर्णय घोषित करत आरोपीला कलम १३८ अन्वये दोषी ठरवून गजाआड पाठवण्याचे आदेश दिले. या संपूर्ण कायदेशीर लढाईत निकाल आपल्या बाजूने खेचून आणण्यात कायदेतज्ज्ञांच्या टीम ने मोलाची भूमिका बजावली. यामध्ये प्रत्यक्ष न्यायालयसमोर युक्तिवाद ॲड. तुषार ए. विधाते यांनी केला. या संपूर्ण खटल्याच्या अचूक नियोजनात आणि यशात ॲड. आदर्श जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले.

## राज्यातील जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचा सहा महिन्यांत अहवाल सादर करा

### ना.पंकजाताई मुंडे यांनी मंत्रालयात घेतला विभागाचा आढावा



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील विविध रुग्णालयांतून निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याचे प्रमाण, त्यावरील प्रक्रिया, वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता, प्रत्यक्ष कामकाज आणि संबंधित भागातील गरज यांचा सखोल अभ्यास करून सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांच्या कामकाजावर नियमित नियंत्रण ठेवण्याबरोबरच विद्यमान धोरणात आवश्यक बदल करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांबाबतची सद्यस्थिती व अधिकार क्षेत्राच्या पुनर्रचनेसंदर्भात मुंडे यांनी आज मंत्रालयीन दालनात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, उपसचिव जॉय ठाकूर आदी उपस्थित होते. राज्यातील वैद्यकीय कचरा (बायो-मेडिकल वेस्ट) व्यवस्थापनाची सध्याची स्थिती, उपचार केंद्रांची क्षमता, परवानगी प्रक्रिया आणि देखरेख याबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. केंद्र शासनाच्या नियमानुसार

### नवीन परवाने देताना गॅप ॲनालिसिस चा विचार करा

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करून त्यानुसार राज्याचे धोरण अद्ययावत करण्यात यावे. नवीन परवाने देताना 'गॅप ॲनालिसिस'चा विचार करावा आणि संबंधित भागातील प्रत्यक्ष गरज लक्षात घ्यावी, असेही निर्देशही श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिले. वैद्यकीय कचऱ्याच्या अयोग्य विल्हेवाटीमुळे पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नियमांचे काटेकोर पालन, वेळेवर तपासणी आणि जबाबदारी निश्चित करण्यावर भर देण्यात यावे. तसेच निर्देशांची तातडीने अंमलबजावणी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचनाही श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या.

जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया केंद्रांना परवाने देताना रुग्णालयांना पर्याय उपलब्ध व्हावेत, स्पर्धात्मक व्यवस्था निर्माण व्हावी आणि सेवा अधिक कार्यक्षम व्हावी. एखाद्या संस्थेवर संपूर्ण अवलंबून राहण्याऐवजी विविध भागांमध्ये पुरेशी प्रक्रिया केंद्रे उपलब्ध असावीत, असे मत मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केले. वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची क्षमता, प्रत्यक्षात होणारे काम आणि संबंधित भागातील गरज यांचा नियमित आढावा विभागाच्या सचिवांनी घ्यावे, असे निर्देश देण्यात आले. केंद्रांच्या कामकाजावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) प्रभावी देखरेख ठेवावी, तसेच कचऱ्याची विल्हेवाट योग्य पद्धतीने होत आहे की नाही याची तपासणी करावी, असेही श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.

## पान १ वरून...

### गाळमुक्त धरण योजनेला

झाल्यानंतरच निधी अदा केला जाईल. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानासाठीही शासनाने स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. गाळ नेलेल्या शेतकऱ्यांचा पंचनामा, प्रत्यक्ष पडताळणी आणि आवश्यक कागदपत्रांची खातरजमा केल्यानंतरच अनुदानाचे वितरण करण्यात येणार आहे. हे अनुदान ग्रामपंचायत अथवा आरटीजीएसद्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले जाणार आहे. निधी मंजूर रकमेपेक्षा अधिक अदा करता येणार नाही, तसेच कोणत्याही कारणाने निधी खर्च न झाल्यास तो इतर कामांसाठी वापरण्यास मनाई करण्यात आली असून तो तात्काळ शासनाकडे परत जमा करावा लागणार आहे. निधी वितरणापूर्वी संबंधित कामाबाबत कोणतीही तक्रार नसल्याची खातरजमा करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत झालेल्या कामांच्या देयकांची तपासणी आणि छाननी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. निधी वितरण प्रक्रियेत कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित कार्यालयाला जबाबदार धरण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. राज्यातील जलसंधारण प्रकल्पांमध्ये साचलेला गाळ काढल्यामुळे धरणे, तलाव आणि नाल्यांची पाणी साठवण क्षमता वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर हा सुपीक गाळ शेतात टाकल्याने जमिनीची उत्पादकता वाढते. त्यामुळे या योजनेला जलसंधारणाबरोबरच शेती विकासाचा दुहेरी लाभ देणारी योजना म्हणून पाहिले जाते. शासनाच्या या निर्णयामुळे प्रलंबित देयके मिळण्यास गती मिळणार असून राज्यातील जलसंधारण कामांना नव्याने चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

-------------

### तुम्ही काय तुडवणार, शिवसैनिक तुमच

छातीचा कोट करून लढेल. मी डॉक्टर नसलो तरी ऑपरेशन करतो, ऑपरेशन करायला वाघाचे काळीज लागते, लांडग्याचे नाही, असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला. उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, ''रक्ताचे नाते सांगून, कोणी वारस होत नाही, सात बारावर नाव लावून कोणी वारस होत नाही, शिवसेना म्हणजे जमिनीचा तुकडा नाही, शिवसेना म्हणजे काळजाचा तुकडा आहे. बाळासाहेबांच्या हयातीत तुम्ही त्यांना त्रास देत होता. बाळासाहेब गेल्यानंतर त्यांना तिरस्कार असलेल्या लोकांचा पुरस्कार तुम्ही केला. शिवसेना पहिल्यांदा कोणी फोडली तर ती राष्ट्रवादीने. दुसऱ्यांदा कोणी फोडली तर ती काँग्रेसने. ते यांना पुढे करतात आणि ज्याने शिवसेनेचा भगवा यातून मुक्त केला त्याच्यावर टीका करतात.'' एकनाथ शिंदे म्हणाले की, ''आमदार मंत्र्याचा मुलगा आहे म्हणून संधी देणार नाही, त्याने जर कर्तृत्व केलं, काम केलं तर त्याकडे दुर्लक्षही करणार नाही. पक्ष म्हणजे आमदार-खासदार नाही, मंत्री नाही, तर पक्ष म्हणजे शिवसैनिक आहे. त्यांना जपलं पाहिजे. निवडणुकीनंतरही कार्यकर्ता हा आवडताच असला पाहिजे. कार्यकर्ता वाढला पाहिजे, तरच पक्ष वाढेल.'' माझ्याकडे वशिला लागत नाही, पैसे लागत नाही, मर्सिडीस लागत नाही, माझे लक्ष सगळ्यांकडे असते. त्यामुळेच आपण भीमाच्या पोरीला, ज्योती वाघमारेला राज्यसभा खासदार केलं. त्यामुळे सर्वसामान्य शिवसैनिकाला आपण संधी देतो, असं एकनाथ शिंदे म्हणाले. आनंद दिघे पाठीशी होते. आनंद दिघे आणि बाळासाहेब सोडून गेले. आज माझे नेते, कार्यकर्ते हेच माझे कुटुंब आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. देवेंद्र फडणवीस आणि माझ्यामध्ये खोडा घालायचा प्रयत्न काही लोक करतात. पण आम्ही खुर्चीसाठी एकत्र आलो नाही. कुछ लोग छुप छुप कर उन्हे बताते है, वो सब आकर हमें बताते है, असंही ते म्हणाले.

------------

### 'तुम्हाला मुलं होत नाहीत तर आमची

आमची का पळवता'' अशा शेलक्या शब्दांत उद्धव ठाकरे यांनी विरोधकांवर घणाघात केला. मुंबईतील षणमुखानंद सभागृहात शिवसेना ठाकरे गटाचा ६० वा वर्धापनदिन पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला शिवसेनेच्या ६० वर्षांतील प्रवासात ज्यांनी ज्यांनी योगदान दिले, त्यांचे स्मरण केले. ते म्हणाले, ''शिवसेनेसाठी अनेकांनी बलिदान दिले, तुरुंगवास भोगला, रक्ताचे पाणी केले. त्यातले काही जण आज आपल्यात आहेत, काही जण नाहीत. त्या सर्वांना मी विनम्र अभिवादन करतो. शिवसेनाप्रमुखांसह जी पहिली फळी होती, त्यांनी घेतलेल्या कष्टामुळेच शिवसेना कानाकोपऱ्यात पसरली.'' शिवसेनेच्या आजवरच्या वाटचालीत अनेक संकटे आली. आज आलेले संकट त्यासमोर काहीच नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. ''ज्यावेळी आपण आपल्या यश-अपयशाची तुलना निवडणुकीच्या निकालाशी करायला लागलो, त्यावेळी आपण फसलो'', असे विधान यावेळी उद्धव ठाकरे यांनी केले. काँग्रेसमध्ये विलीनीकरणाच्या चर्चेबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, शिवसेना विलीन होण्यासाठी आलेली नाही. तर मराठी माणसाच्या आणि हिंदुत्वाच्या न्याय हक्कासाठी आणि रक्षणासाठी जन्माला आलेली आहे. काँग्रेसनेही आपल्याला छळलेच होते. आपले अर्ध्याहून अधिक आयुष्य काँग्रेसबरोबरच्या शत्रुत्वात गेले आहे. आपले टोकाचे वैर होते. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी एका वृत्तपत्राला मुलाखत देताना ठाकरे गट सोडण्याचे कारण सांगितले. उद्धव ठाकरे प्रचारासाठी प्रकृती ठिक नसल्याने येत नाहीत. पण निदान आदित्य ठाकरेंनी तरी फिरायला हवे, असे निंबाळकर म्हणाले. या विधानावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, ''मी भेटत नाही, फिरत नाही, असे म्हटले गेले. मग मी जर प्रचाराला येत नव्हतो, तर तू (निंबाळकर) निवडून कसा आलास? लोकसभेच्या प्रचारासाठी मी प्रत्येक मतदारसंघात अनेक सभा घेतल्या होत्या. तेव्हा हे लोक निवडून आले.'' असे ते म्हणाले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणाचा समारोप अत्यंत नाट्यमयरितीने केला. माझ्या नेतृत्त्वावर होणारे आरोप तुम्हाला खरे वाटत असतील तर मी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला या क्षणी तयार आहे. माझ्या जागी एखाद्या सामान्य शिवसैनिकाला त्या पदावर बसवा. मला नेतृत्त्वाची कोणतीही हाव नाही. मी कोणत्याही क्षणी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडायला तयार आहे, असे वक्तव्य त्यांनी केले. उद्धव ठाकरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख हे पद सोडण्याची भाषा करताच उपस्थित शिवसैनिकांनी जागेवरुन उठून त्या प्रस्तावाला विरोध केला. उद्धव ठाकरे यांच्या या अनपेक्षित प्रस्तावामुळे आता ठाकरे गटात काही संघटनात्मक बदल होणार का, अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

-------------------

### तुळजाभवानी मंदिरात व्हीआपयी दर्शन बंद

अथवा विशेष पासधारकांसाठी स्वतंत्र दर्शन व्यवस्था राहणार नाही. सर्व भाविकांना एकाच मार्गाने आणि एकाच रांगेतून देवीचे दर्शन घेता येणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेला व्हीआयपी आणि सामान्य भाविकांमधील फरक आता संपणार आहे. विशेष म्हणजे, आता सर्व भाविकांना सिंहाच्या गाभाऱ्यातून आई तुळजाभवानीचे दर्शन घेण्याची समान संधी उपलब्ध होणार आहे. यापूर्वी काही विशिष्ट वर्गातील भाविकांना विशेष सुविधा दिल्या जात असल्याने सर्वसामान्य भक्तांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. मात्र नव्या निर्णयामुळे प्रत्येक भक्ताला समान दर्जाचे दर्शन मिळणार असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. मंदिर संस्थानाच्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे. धार्मिक स्थळांवर सर्व भाविकांना समान वागणूक मिळावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून होत होती. त्या पार्श्वभूमीवर तुळजाभवानी मंदिर प्रशासनाने घेतलेला हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. दरम्यान, आगामी उत्सव, नवरात्र महोत्सव आणि सुट्ट्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन दर्शन व्यवस्थेचे नियोजन अधिक प्रभावी करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नवीन व्यवस्थेमुळे गर्दी नियंत्रण, रांग व्यवस्थापन आणि भाविकांचा दर्शनाचा अनुभव अधिक चांगला होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. तुळजापूरमध्ये येणाऱ्या लाखो भाविकांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरत असून, ''देवीच्या दरबारात सर्वजण समान'' हा संदेश या निर्णयातून अधोरेखित झाल्याची भावना भाविकांकडून व्यक्त केली जात आहे.

-----------

### मराठा विद्यार्थ्यांची घेतलेली फी

कारवाई केली जाईल. मुख्यमंत्री यांच्यासमोर हा विषय मांडणार असून, ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे त्यांना ती परत करण्याची व्यवस्था केली जाईल.'' ते पुढे म्हणाले की, ''दोन दिवसांत राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना संबंधित जिआर पोहोचवला जाईल. मराठा उपसमितीच्या बैठकीतही या विषयावर चर्चा करून आवश्यक निर्णय घेतले जातील. प्रसाद लाड यांनी सांगितले की, गेल्या १५ दिवसांत मराठा समाजाच्या मागण्यांबाबत अनेक महत्त्वाचे जिआर आणि परिपत्रके काढण्यात आली आहेत. एमआयडीसी मधील नोकरीसंदर्भातील आदेश, आंदोलनातील मृतांच्या कुटुंबियांना मदत, तसेच हैदराबाद गॅझेट आणि प्रमाणपत्र पडताळणीसाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. लाड यांनी स्पष्ट इशारा देताना म्हटले, कोणताही अधिकारी अंमलबजावणीत अडथळा निर्माण करत असेल किंवा 'शुक्राचार्य' बनण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला सोडले जाणार नाही. त्यांनी सांगितले की, शिंदे समितीची मुदत वाढवण्यात आली असून, ५८ लाख नोंदींचा डेटा समितीकडे देण्यात येणार आहे. यासाठी स्वतंत्र कक्षही काम करत आहे. प्रसाद लाड यांनी शेवटी म्हटले, ''मुख्यमंत्री सकारात्मक भूमिका घेत आहेत. स्वतंत्र मराठा कक्ष स्थापन करण्याचे काम सुरू आहे. माझ्याकडून काम करताना काही चूक झाली असेल तर मी माफी मागतो. मराठा समाजाच्या प्रश्नांवर सरकार सातत्याने काम करत राहील.''

--------------

### जालन्यात पटेल दूध

तपासणी केली. या तपासणी दरम्यान डेअरीमध्ये सुमारे १० क्विंटल म्हशीचे दूध आढळून आले. संबंधित दुधाचे नमुने घेऊन ते अधिकृतपणे सील करण्यात आले आहेत. हे नमुने पुढील रासायनिक विश्लेषणासाठी छत्रपती संभाजीनगर येथील अन्न विश्लेषक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. ही कारवाई सहायक आयुक्त नि.सु. कुलकर्णी, अन्न सुरक्षा अधिकारी अश्विनी तांबे, अन्न सुरक्षा अधिकारी अनुजा नगरारे आणि नमुना सहाय्यक धम्मदीप नरवडे यांच्या पथकाने केली. यावेळी पटेल दूध डेअरीचे मालक अजीम पटेल यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, अन्न व औषध प्रशासन विभागाकडून वेळोवेळी त्यांच्या डेअरीतील दुधाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात येतात. प्रत्येक वेळी तपासणीमध्ये त्यांचे दूध पूर्णपणे शुद्ध आणि दर्जेदार आढळून आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आजही विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुधाचे नमुने संकलित केले असून, ते पुढील तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रिया पार पडेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

--------------

### सुभाष चौरे यांना 'आदर्श पत्रकारिता'

निवड करण्यात आली आहे. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्योजक, शेती, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, कला-संस्कृती, राजकीय, प्रशासकीय, वैद्यकीय, महसूल, ग्रामविकास, क्रीडा, दिव्यांग आणि बचत गट अशा विविध क्षेत्रांत समाजोपयोगी कार्य करणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. या पुरस्काराचा वितरण सोहळा दिनांक २० जून २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० या वेळेत अहिल्यानगर येथील 'हॉटेल मेघनाद' येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून सन्मान स्वीकारण्याचे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे. या पुरस्कार सोहळ्यासाठी आमदार सुरेश धस आमदार संग्राम जगताप ज्येष्ठ समाजसेवक पोपटराव पवार आमदार कर्डिले यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत

---------------

### १० हून अधिक कर्मचारी असलेल्या

म्हणाल्या की, कोणत्याही महिलेला तिची प्रतिष्ठा आणि उपजीविका यांपैकी एकाची निवड करावी लागू नये. प्रत्येक कामाची जागा सुरक्षित आणि आदराची असणे हा केवळ कायदा नसून, महिला सक्षमीकरणासाठी आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. सरकारी विभाग, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल्स आणि खासगी कंपन्या जिथे १० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांना दरवर्षी 'पॉश' अंतर्गत अंतर्गत समिती स्थापन करावी लागेल. तसेच वार्षिक ऑडिटचा अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा लागेल. ऑडिट न केल्यास ती गंभीर बेकायदेशीर बाब मानली जाईल. राज्य स्तरावर या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी स्वतंत्र 'पॉश मॉनिटरिंग सेल' किंवा डिजिटल डॅशबोर्ड तयार केला जाईल. तसेच केंद्र सरकारच्या ऑनलाइन 'शी-बॉक्स' प्रणालीचा वापर वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. तक्रारदार महिला, साक्षीदार किंवा समिती सदस्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास, भेदभाव किंवा सूडबुद्धीने बदली सामोरी जावे लागणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, हॉस्टेल्स, कोचिंग क्लासेस तसेच हॉस्पिटल्समधील महिला कर्मचारी, विद्यार्थिनी, इंटर्न्स आणि कंत्राटी कामगार अधिक संवेदनशील घटकात येतात. त्यामुळे या सर्व ठिकाणी 'पॉश' कायद्याचे नियम पाळले जात आहेत की नाही, यावर जिल्हा प्रशासन विशेष लक्ष ठेवणार आहे. कामाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि आपत्कालीन मदत यंत्रणा उभारून महिलांसाठी 'झिरो टॉलरन्स' (अन्यायाविरुद्ध शून्य सहनशीलता) धोरण राबवण्याचे कडक आवाहन महिला आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना आणि पोलीस महासंचालकांना केले आहे.


## तहसिल कार्यालय घनसावंगी

Phone No: 02483/278621 Email ID: ID-tahghan@gmail.com

जा.क्र.२०२६/जमाबंदी/१५५/कवी Date: 18/06/2026

### जाहीर प्रगटन

वादी: श्री. शेषराव पी. नारायण जोशी, रा.तीर्थपुरी

विरुद्ध (प्रतिवादी): १.जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र. १४, वडीगोद्री, २. श्रीम. नानीबाई आत्माराम शिंगटे, ३. श्रीम. झुंबरबाई नवनाथ तांबोरे, ४. श्री. बळीराम नवनाथ तंबोरे (रा.मुरमा खु.ता. घनसावंग जि. जालना), ५. श्रीम. राधा जगन्नाथ उढाण, रा.कंडारी, अंबड ता. घनसावंगी

**विषय: मौ.खालापुरी ता. घनसावंगी गट नं. १८६ क्षेत्र दुरुस्ती बाबत सुनावणी नोटीस.**

मसुदा / मजकूर:

उपरोक्त नमूद प्रतिवादी यांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणात मौ.खालापुरी ता. घनसावंगी येथील गट नं. १८६ च्या जमिनीबाबत क्षेत्र दुरुस्तीची सुनावणी मा. तहसिलदार कार्यालय घनसावंगी येथे ठेवण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी दिनांक २४/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आलेली आहे. या तारखेस आपण स्वतः किंवा आपल्या अधिकृत वकिलामार्फत दाखल करावयाच्या आवश्यक पुराव्यांसह तहसिल कार्यालय घनसावंगी येथे हजर राहावे.

या जाहीर प्रगटनाद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, जर आपण किंवा आपले प्रतिनिधी सदर नियत दिनांकास व वेळी सुनावणीस गैरहजर राहिल्यास, आपले या संदर्भात काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरले जाईल आणि उपलब्ध अभिलेखांच्या व पुराव्यांच्या आधारे सदर प्रकरणाचा एकतर्फी निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/-**
**तहसिलदार घनसावंगी**

## थोडक्यात

### 'जातमुक्त गाव सौंदाळा' डॉक्युमेंटरीला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाच पुरस्कार

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील निमगाव या गावातील रहिवासी आकाश वाघमारे यांनी सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारी 'जातमुक्त गाव सौंदाळा' ही मराठी डॉक्युमेंटरी आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविण्यात आली आहे. प्रतिष्ठित इंडो जपान इंटरनॅशनल फेस्टिव्हल मध्ये या डॉक्युमेंटरीला एकूण पाच पुरस्कार प्राप्त झाले आहेत.




या डॉक्युमेंटरीला बेस्ट डॉक्युमेंटरी, बेस्ट स्टोरी, बेस्ट स्क्रीनप्ले, बेस्ट इंटरनॅशनल फिल्ममेकर अवॉर्ड तसेच बेस्ट एडिटर हे मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. या यशामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व चित्रपट क्षेत्राची मान उंचावली आहे.जातमुक्त गाव सौंदाळा' या डॉक्युमेंटरीची निर्मिती ए. एस. लोटस प्रोडक्शन यांनी केली असून, दिग्दर्शन आकाश वाघमारे यांनी केले आहे. सह-दिग्दर्शक म्हणून शुभम निर्मळ यांनी काम पाहिले असून, चित्रपटाचे संकलन (एडिटिंग) अनमोल पाटील यांनी केले आहे.सौंदाळा गावाने जातीय सलोखा, सामाजिक समानता आणि मानवतेचा आदर्श निर्माण करत ''जातमुक्त गाव'' म्हणून मिळवलेल्या ओळखीचा प्रेरणादायी प्रवास या डॉक्युमेंटरीत प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. सामाजिक विषयाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या सन्मानामुळे चित्रपटाच्या संपूर्ण टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### जिजाई मसाले प्रायव्हेट लिमिटेडच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



शिरूर । प्रतिनिधी

बावी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी जिजाई मसाले या कंपनीकडून दप्तर, वही ,कंपास, पेटी, पिटी ड्रेस, शाळेचा ड्रेस,इत्यादी साहित्य मोफत वाटण्यात आले .हा उपक्रम एक सामाजिक बांधिलकी म्हणून राबवण्यात आल्याचे कंपनीचे सर्वेसर्वा बाबू भैया गरजे यांनी सांगितले.

देशाच्या भविष्यासाठी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस यांचे चिरंजीव सागर आप्पा धस हे होते. ज्या शाळेत आपण शिकलो त्या शाळेसाठी आपणाला काहीतरी करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो .आजच्या मुलांना दप्तर दिले किंवा शैक्षणिक साहित्य दिले ते आपल्या भारताचे भविष्य आहे पुढे चालून हीच मुलं वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नावलौकिक करणार आहेत .आष्टी तालुक्यातील या एकमेव शाळेतील विद्यार्थी पटसंख्या पहिली ते पाचवी १२० आहे. बीड जिल्ह्यातील ही पहिली शाळा आहे की ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी शैक्षणिक साहित्य देण्यात येते या सर्व गोष्टी करत असताना आपणाला मनस्वी आनंद होत आहे असे गरजे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष त्यांच्या भाषणामध्ये असे म्हणाले की शाळेसाठी आपणाला जे जे काही करता येईल ती मदत करण्याचा आमचा पुरेपूर प्रयत्न राहील ते पुढे असे म्हणाले की, असे उपक्रम प्रत्येकाने चालू केले पाहिजे

# शिकवणी परिसराच्या ठिकाणी गुंडगिरी

## बारावीच्या विद्यार्थ्यावर प्राणघातक हल्ला, प्रकृती चिंताजनक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील शिकवणी असलेल्या आनंदनगर ठिकाणाहून रात्री अभ्यासिका संपवून रूमवर परतणाऱ्या आशिष विनोद माने या १७ वर्षीय विद्यार्थ्यावर दुचाकीवरून आलेल्या तीन गुंडांनी भर रस्त्यावर लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या आशिषला उपचारासाठी लातूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेमुळे शिकवणी असलेल्या भागात सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून पालकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आशिष माने (वय १७, रा. रेपेवाडी,सध्या रा. माळीनगर, अंबाजोगाई) हा १२ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी आहे. तो अंबाजोगाईत किरायाने खोली करून राहतो. बुधवारी (दि.१७) रात्री १२ वाजेच्या सुमारास तो परिसरातील एका अभ्यासिकेतून अभ्यास करून पायी जात असताना हा प्रकार घडला. यावेळी दुचाकीवर आलेल्या साहिल मांदळे, जीतू मांदळे आणि एका अल्पवयीन आरोपीने त्याला विनाकारण शिवीगाळ करत अडवले. गाडीवरून उतरलेल्या एका आरोपीने जीवे मारण्याच्या उद्देशाने आशिषच्या डोक्यात लाकडी दांडक्याने जोरात प्रहार केला. या अनपेक्षित हल्ल्यामुळे आशिष रस्त्यावर कोसळला. घटना घडल्यानंतर हल्लेखोर दुचाकीवरून पसार झाले. यावेळी जखमी झालेल्या आशिषने मदतीसाठी धावून आलेल्या व्यक्तीला फोनचा पासवर्ड दिला आणि बेशुद्ध झाला. त्या व्यक्तीने अशिषच्या आईला फोन करून त्याला रुग्णालयात दाखल केले. सध्या अशिषवर लातूर येथील रुग्णालयात उपचार सुरु असून डोक्याला मार असल्याने त्याची प्रकृती गंभीर आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम १०९, ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वशिष्ठ कागणे करत आहेत.

### पोलिसांनी गुंडगिरी आटोक्यात आणावी

अंबाजोगाईतील ट्युशन एरियात आधीपासूनच गुंड प्रवृत्तीच्या तरुणांचा वावर सध्या तो मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या भागात गुंडांचे विविध टोळके सतत दहशत निर्माण करत असून विद्यार्थिनींच्या विनयभंगाचे प्रकार आणि मारामाऱ्या नित्याच्याच झाल्या आहेत. पोलिसांची गस्त नियमित होत नसल्याने या भागात गुंडगिरी कमालीची फोफावली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. थेट जीव घेण्याचा प्रयत्न करण्यपर्यंत या टवाळखोरांची मजल गेली आहे. या भागात बेफाम वेगाने गाड्या पळवून रहिवाशांना त्रास दिला जात आहे. उद्या जर एखाद्या विद्यार्थ्याचा जीव गेला तर जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. पोलिसांनी असे गुंड तरुण शोधून तातडीने त्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

### तिन्ही आरोपी पोलिसांच्या ताब्यात

दरम्यान, घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस निरिक्षक शरद जोगदंड यांनी तातडीने रात्रीतून पथक पाठवून शोध घेत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. यात साहिल मांदळे, जीतू मांदळे आणि एका अल्पवयीन आरोपीचा समावेश आहे. साहिल आणि जीतू मांदळेला शुक्रवारी अंबाजोगाई येथील न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे.

## केंद्र सरकारच्या माध्यमातुन बीड जिल्ह्यात मंजूर रेल्वे स्थानक कामांना जिल्हाध्यक्षांसह भाजप पदाधिकाऱ्यांची भेट

बीड । प्रतिनिधी

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या १२ वर्षांच्या कारकिर्दीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने केंद्र सरकारच्या वतीने बीड जिल्ह्यात झालेल्या विविध विकासकामांना भेटी देण्यात आला. यानिमित्त भाजप पदाधिकाऱ्यांनी बीड रेल्वे स्थानकाला भेट देऊन रेल्वे प्रकल्पासह जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या महत्त्वाच्या विकासकामांची पाहणी करुन मोदीजींचे आभार व्यक्त केले.



भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या भेटीदरम्यान पदाधिकाऱ्यांनी बीडकरांच्या दीर्घकालीन स्वप्नपूर्ती ठरलेल्या रेल्वे प्रकल्पाला भेट देऊन . लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांनी बीड जिल्ह्याला रेल्वे जोडणी मिळावी, यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. जिल्ह्यात रेल्वे यावी हे त्यांचे स्वप्न होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने या प्रकल्पाला गती दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लोकनेत्या पंकजाताई मुंडे माजी खासदार प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे बीड रेल्वे प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाला असून जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या कार्यकाळात बीड जिल्ह्यात पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी चालना मिळाली. रेल्वे प्रकल्पासोबतच राष्ट्रीय महामार्गांचे जाळे विस्तारण्यात आले असून विविध रस्ते विकासकामे, केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजना, पाणीपुरवठा, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकासाच्या अनेक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासाला गती मिळाली आहे. बीड रेल्वे स्थानकाच्या भेटीदरम्यान पदाधिकाऱ्यांनी स्थानक परिसराची पाहणी करून रेल्वे सेवेमुळे जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि विद्यार्थ्यांना होणाऱ्या सुविधांबाबत चर्चा केली. रेल्वेमुळे बीड जिल्ह्याचा राज्यातील तसेच देशातील विविध भागांशी संपर्क अधिक मजबूत होणार असून व्यापार, उद्योग आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या प्रसंगी ॲड. सर्जेराव तांदळे, नवनाथ आण्णा शिराळे, शिवाजी आप्पा मुंडे, सलीम जहागीर, अशोक लोढा, प्रा. देविदास नागरगोजे, ॲड. गोविंद शिराळे, प्रमोद पुसरेकर, अमोल वडतिले, आप्पा झोडगे, अमर सानप, सचिन टिपते, सलीम अत्तार यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. भाजपच्या वतीने मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात देशासह बीड जिल्ह्यात झालेल्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून बीड रेल्वे स्थानक भेटीचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### आ.सोळंकेच्या तालुक्यात

पंचायत समिती माजलगाव यांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार जिल्हा वार्षिक योजनेतून दोन वर्गखोल्यांचा प्रस्ताव पाठविण्यात आला असून मंजुरी मिळताच निधी उपलब्ध करून बांधकाम सुरू करण्यात येईल, असे लेखी आश्वासन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. किरण कुंवर यांनी दिले आहे. मात्र मंजुरीच्या प्रक्रियेत वेळ जात असताना विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि सुरक्षितता दोन्ही धोक्यात आले आहेत. त्यामुळे शासन, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नवीन शाळा इमारतीसाठी निधी मंजूर करावा, अशी जोरदार मागणी पालकांकडुन होत आहे.

### वाहतूक शाखेच्या दक्षतेमुळे

श्री. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. वैभव पाटील व त्यांच्या संपूर्ण पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. चोरीचा मुद्देमाल शोधून तो संबंधित पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्याच्या या कार्यवाहीमुळे बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या दक्षतेचे व तत्परतेचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

### माजी प्राचार्य ह.भ.प. त्रिंबक

वाढीसोबतच विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्ये रुजवण्यावर त्यांनी विशेष भर दिला होता. वारकरी संप्रदायातही त्यांचे मोठे योगदान होते. कीर्तन, प्रवचन आणि सामाजिक जनजागृतीच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि मनमिळाऊ स्वभाव ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होती. सर्वांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची कार्यशैली अनेकांना प्रेरणादायी ठरली.त्यांच्या पश्चात एक बहीण, तीन भाऊ, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच परिसरातील नागरिक, माजी विद्यार्थी, सहकारी शिक्षक तसेच वारकरी संप्रदायातील भाविकांनी हळहळ व्यक्त केली आहे.ह.भ.प. त्रिंबक महाराज मातकर यांच्या निधनाने एक अभ्यासू शिक्षक, कुशल प्रशासक आणि समाजाभिमुख कीर्तनकार हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्या कार्याची आणि विचारांची प्रेरणा समाजाला पुढील काळातही मार्गदर्शक ठरेल, अशा भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहेत.

### सत्ताधारी व बोगस गुत्तेदारांच्या

साहेबांचे अंगावर घालायला सुरुवात केली होती म्हणून फडसे साहेबांना मजबुरीने जावं लागले आहे, उपायुक्त श्री. शैलेश पडसे भावनिक होऊन म्हणाले की मला बीडच्या सर्वसामान्य जनता आवडली होती म्हणून बीडसाठी मुलभूत सुविधांसह नवनवीन योजनेतून शहराचा चेहरामोहरा बदलायचे आडेखडे तैयार केले होते पण काही अपरिहार्य कारणास्तव मला बीड सोडावं लागले आहे, यावेळी नगरसेवक अशोक काळे, बबबु भाई, अक्षय जाधव, पठाण अय्युब खान, भारत कांबळे, पठाण मसुद खान, शेख अफसर, शेख रईस, शेख रोहिल, मसी मोमीन, रंजीत पिंगळे, शरफोदिन मामु, पाणी पुरवठा प्रमुख अमोल बागलाने, स्वच्छता प्रमुख भागवत जाधव यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### निसर्गाने भरभरून दिले,

प्रशासन झोपेत, नागरिक टँकरच्या प्रतीक्षेत!

पंचायत समितीकडून ११ गावांसाठी प्रस्ताव आले, मात्र आतापर्यंत फक्त पाच टँकर मंजूर झाले आहेत. उर्वरित गावांतील नागरिकांना अजूनही पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. विहिरी आणि कूपनलिकांनी तळ गाठला असून परिस्थिती आणखी गंभीर झाल्यास स्थलांतराची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे.गतवर्षी निसर्गाने विक्रमी पाऊस दिला, प्रकल्प भरले, मात्र त्याचे योग्य नियोजन करण्यात प्रशासन सपशेल अपयशी ठरले. त्यामुळे आता निर्माण झालेल्या टंचाईला निसर्गाला दोष देण्यापेक्षा संबंधित विभागांच्या निष्क्रियतेचा आणि ढिसाळ नियोजनाचा हा परिणाम असल्याचे बोलले जात आहे. ''निसर्गाने कृपा केली, पण प्रशासनानेच आष्टी तालुक्याला तहानले ठेवले; हा दुष्काळ पावसाचा नसून नियोजनशून्य कारभाराचा आहे!''

### शेख राजुभाई यांची

रईस टेलर,मुनाफ मौलाना,बाबुशेख चांद भाई,मोहम्मद दानिश,अब्दुल्ला चाऊस क्रिष्णा चव्हाण यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी उपस्थित राहून नवनियुक्त शहरप्रमुखांचे पुष्पहार घालून स्वागत केले. शेख राजुभाई यांच्या निवडीमुळे गेवराई शहरातील अल्पसंख्याक समाज आणि तरुण वर्गाला पक्षासोबत जोडण्यास मोठी मदत होईल, असा सूर कार्यकर्त्यांमध्ये होता. या वेळी नवनियुक्त शहरप्रमुखांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणार असल्याचे सांगितले.

### महिलांच्या सक्षमीकरणासाठी

सरोजिनीताई ससाने, आंबेजोगाई तालुकाप्रमुख सुनीताताई जाधव, परळी तालुकाप्रमुख यशोदाताई राठोड, परळी शहरप्रमुख सविताताई लिखे, आंबेजोगाई शहरप्रमुख तनुजाताई मुंडे, शिवकन्याताई काकडे, गणोरकर ताई यांच्यासह महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी व महिला शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

लाडक्या बहिणीच्या पाठीशी एकनाथ शिंदे खंबीर उभे -मुळूक

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या मनोगतात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या विचारांवर निष्ठा ठेवून जनतेसाठी काम करण्याचे आवाहन केले. महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी समाजातील प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठविल्यास संघटना अधिक मजबूत होईल. शिवसैनिकांच्या निष्ठा, संघर्ष आणि जनसेवेच्या बळावरच शिवसेना वाढली असून लाडक्या बहिणीच्या पाठीशी एकनाथ शिंदे खंबीरपणे उभे आहेत आगामी काळातही याच ताकदीवर संघटनेचा विस्तार केला जाईल, असा विश्वास जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला.

### उद्योजक हनुमंत जंजीरे यांच्या

देऊन गौरव करण्यात आला. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देताना उपस्थित मान्यवरांनी तिच्या यशाचे कौतुक केले.

यावेळी जयदत्त धस, सागर धस, भाजप विधानसभा अध्यक्ष गणेश शिंदे, जिल्हा परिषद सदस्य माऊली आप्पा जरांगे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, माजी सभापती छत्रगुण मरकड, चेअरमन शांतीलाल भोसले, मराठा सेवा संघ तालुकाध्यक्ष तानाजी जंजीरे, जयसिंग गव्हाणे, पोपट धुमाळ, विनोद रोडे, भरत जाधव, हरिभाऊ लगड, जालिंदर चव्हाण, गंगाधर काकडे, सुनील थोरवे, राजू मुंगसे, अशोक थोरवे, अमोल मिसाळ, करण काकडे, दादा काकडे, नवनाथ बिरंगल, संजय पवार, सुनील गायकवाड, सुदाम आगाशे, संजय पवार,ढेंगे साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

## मनूर शाळेत वर्गवाढीचे आश्वासन; ७ वी व ८ वी वर्ग सुरू करण्याचा शब्द

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मनूर येथील शाळेत पटसंख्येत झालेल्या वाढीमुळे नव्याने सुरू झालेल्या वर्गांच्या निमित्ताने शाळेतील शिक्षक वृंदाने स्वागत समारंभाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमात गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शाळेला ७ वी व ८ वी पर्यंत वर्गवाढ करून देण्याचे आश्वासक शब्द देण्यात आले.




कार्यक्रमात लक्ष्मण पोटभरे यांनी सांगितले की, सध्याची पटसंख्या पाहता शाळेत ७ वी व ८ वी वर्ग सुरू करून दिले जातील. तसेच गावकऱ्यांच्या सहकार्यातून शाळेला डिजिटल शाळा बनवण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी शालेय समिती सदस्य तथा आझाद क्रांती सेनेचे तालुका प्रमुख अशोक श्रावण ढगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.ते म्हणाले,जोपर्यंत आम्ही शालेय समितीवर आहोत, तोपर्यंत शाळेचा आध्यात्मिक विकास आणि ८ वी पर्यंत वर्गवाढीसाठी आम्ही कायम लढा देऊ, असा शब्द मी देतो.या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड सर, पौळ सर, ग्रामपंचायत सदस्य राहुल क्षीरसागर, पांडुरंग पोपळे, ग्रामसेवक कदम,किशोर ढगे, दादा कांबळे, किशोर मस्के, पवार दादाराव, महादू ढगे यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.उपस्थित सर्व मान्यवरांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.गावकऱ्यांनी केलेल्या मागणीला यश आल्याने आनंदाचे वातावरण होते.याप्रसंगी बोलताना अशोक ढगे यांनी सांगितले की, ''आम्ही केलेल्या मागणीला यश आले आहे. पुढील वर्गवाढीसाठी मी व माझी टीम अटी व नियमांनुसार प्रयत्नशील राहू असा शब्द दिला.

## डोक्याची कवटी फोडल्या प्रकरणी आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर

बीड । प्रतिनिधी

डोक्याची कवटी फोडून गंभीर जखमी केल्याप्रकरणातील आरोपीचा जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजुर केला. या प्रकरणी आरोपीची बाजू ॲड. तेजस नेहरकर यांनी मांडली.



फिर्यादी प्रमाणे घटनेची थोडक्यात हाकिकत अशी की , दि. ०१-०४-२०२६ रोजी कानडी बुद्रुक ता. आष्टी जि. बीड येथे शेतीच्या वादातून दोन गटा मध्ये भांडणात किरण यलप्पा गायकवाड यांच्या डोक्याला आरोपीनी गंभीर मारहाण केली होती. त्यामध्ये शस्त्राने डोक्यात मारून डोक्याचे हाड फॅक्चर करून गंभीर दुखापत केली अशी फिर्याद आरोपी विरुद्ध दिनांक ०५ /०६ /२०२६ रोजी पो.स्टे. आष्टी येथे गुन्हा. र. नं. १४५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ११८(१), ११८(२), १८९(२), १९१(२), १९०, ३५२, ३५१(२) अन्वये आरोपी विरोधात जीवे मारण्याचा हेतू आणि तसे कृत्य म्हणून विविध कलमानुसार गंभीर गुन्हा दाखल झाला होता. आरोपीने अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी ॲड. तेजस नेहरकर यांच्या मार्फत मा. जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे अर्ज दाखल केला होता. त्यावर दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकून व आरोपीच्या वतीने दाखल केलेल्या बचावाची बाजु पाहून मा. न्यायालयाने आरोपी गंगाराम शंकर फुलमाळी रा. कानडी बुदृक यास अटकपूर्व जामीन मंजुर केला आहे. अटी व शर्तीवर जामीन मंजुर झाला आहे. आरोपीतर्फे ॲड. तेजेस सुभाष नेहरकर यांनी काम पाहिले यांना ॲड. गौतम नाईकवाडे ,ॲड.ॲड. दत्ता केसकर, ॲड. रविराज विठ्ठल राठोड, ॲड. अविनाश रामभाऊ नेहरकर, व ॲड. सिंकदर शेख यांनी सहकार्य केले.

## मानव विकासच्या बसेस बंद झाल्याने ग्रामीण मुलींच्या शिक्षणावर विपरीत परिणाम

वडवणी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या मानव विकास योजनेअंतर्गत धावणाऱ्या वडवणी तालुक्यातील सर्व अकरा बसेस बंद झाल्याने तालुक्यातील हजारो विद्यार्थिनींच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या मुलींना आता प्रवासाची मोठी अडचण निर्माण झाली असून, शिक्षण घ्यायचे कसे? असा प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे.

ज्या तालुक्यांमध्ये मानव विकास निर्देशांक खुपच कमी आहे, अशा तालुक्यांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून मानव विकास योजना मागील अनेक वर्षांपासून राबवली जात होती. यामध्ये बीड जिल्ह्यातील शिरुर कासार व वडवणी या दोन तालुक्यांचा समावेश होता. सरकारच्या या मानव विकास योजनेच्या माध्यमातून वडवणी



तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित आणि सुलभ प्रवासाची सुविधा मिळत होती. या बससेवेचा आधार घेवून अनेक गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील मुलींनी उच्च शिक्षणाची वाट धरली होती. मात्र आता अचानक ही सेवा बंद झाल्याने नुकत्याच सुरु झालेल्या नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनींच्या शिक्षणात अडथळा निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील अनेक गावांमधून शाळा व महाविद्यालये दूर अंतरावर आहेत. वडवणी तालुक्यातील ग्रामीण व डोंगरी भागात कोणत्याही स्वरुपाची शासकीय

* वडवणी तालुक्यातील हजारो विद्यार्थिनींच्या शिक्षणावर प्रश्नचिन्ह
* मुलींना पारतंत्र्यात ठेवून सरकार काय साध्य करणार?
* ग्रामीण भागातील पालकांमध्ये संताप उसळला

वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्याने व खासगी वाहनांचा खर्च परवडत नसल्याने अनेक विद्यार्थिनींना आता शिक्षण सोडण्याची वेळ येण्याची भिती पालक व्यक्त करत आहेत. शासनाने मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याऐवजी प्रवासाची सुविधा बंद करुन त्यांना पुन्हा जुन्या बंधनात ढकलण्याचा प्रयत्न करु नये, अशी भावना पालकांमधून व्यक्त होत आहे. मुलींना शिक्षणाच्या संधी द्यायच्या की पुन्हा चूल आणि मूल याच चौकटीत ठेवायचे? असा सवालही संतप्त पालकांनी यानिमित्ताने



उपस्थित केला आहे. मानव विकास योजनेच्या धर्तीवर किमान एसटी महामंडळाच्या बसेस तरी पूर्ववत सुरु करण्यात याव्यात, अशी मागणी आता ग्रामीण भागातून जोर धरत आहे. या प्रश्नावर शासनाने व प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अन्यथा सर्व संतप्त पालक बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देवून घेराव आंदोलन तसेच बेमुदत उपोषण करण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येत आहे. विद्यार्थिनींच्या शिक्षणाचा प्रश्न लक्षात घेता शासन व प्रशासनाने तातडीने निर्णय घेवून बससेवा सुरु करावी, अशीही मागणी पालक, विद्यार्थी आणि नागरिकांकडून होत आहे.

### वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा सुरुच - गटशिक्षणाधिकारी राहूल भट्टी

दरम्यान पूर्वी वडवणी तालुक्यामध्ये मानव विकास योजनेअंतर्गत संपूर्ण तालुक्यातील ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थिनींसाठी एकूण ११ बसेसव्दारे विद्यार्थिनींची घर ते शाळा अशी मोफत प्रवास योजना राबवली जात होती. परंतू यावर्षीचे नविन शैक्षणिक वर्ष दि.१५ जून पासून सुरु झाल्यानंतरही सदरील बससेवा बंद केली असल्याचे राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कळविले. मात्र बसेस बंद झाल्याने या विद्यार्थिनींना शाळेत येण्यासाठी अडचणी येत असून यासंदर्भात विविध शाळा व पालकांनी आमच्याकडेही याबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद व राज्य परिवहन महामंडळाकडे या बसेस सुरु करण्यासंदर्भात देखील लेखी स्वरुपात पाठपुरावा सुरु असल्याची प्रतिक्रिया वडवणीचे गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी यांनी यावेळी दिली.

# उपसाबंदीच्या विरोधात राजू शेट्टी आक्रमक

## कोल्हापुरात धरणे आंदोलन, उपसा पूर्ववत सुरू करण्याचे प्रशासनाकडून आश्वासन

कोल्हापूर / प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील धरणांमध्ये ३१ ऑगस्टपर्यंत पुरेल इतका पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असताना उपसाबंदी लागू करण्यात आली. याचा फटका शेतकऱ्यांना बसला. शेतपिके वाळू लागली आहेत, असे सांगत या गंभीर परिस्थितीच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि. १९ जून) स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले.

येथील धरणांमध्ये पाणीसाठा उपलब्ध असताना राज्य सरकार व प्रशासनाकडून चुकीचा अहवाल सादर करून उपसाबंदी आदेश लागू करण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पाणी दिले जात नाही, पण कर्नाटकसाठी पाणी सोडले जात असल्याचा आरोप शेट्टी यांनी केला. उपसाबंदी





रद्द करावी, अशी मागणी धरणे आंदोलनावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांनी पिकांना खते टाकली आहे. पण पाणी नसल्याने कडक उन्हात पिके वाळून जात आहे. वीज जोडणी तोडली जाणार असल्याचे शेतकऱ्यांना आधीच माहित झाले असते तर त्यांनी पिकांना खत टाकली नसती. कोणतीही पुर्वसूचना न देता अचानकपणे शेतीसाठी वीज पुरवठा खंडित करण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे शेट्टी यांनी निदर्शनास आणून दिले. दरम्यान, उद्यापासून पुढील तीन दिवसांसाठी शेतीसाठीचा पाणी पुरवठा आणि उपसा पूर्ववत सुरू करण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याचे शेट्टी यांनी म्हटले आहे. त्यांची आज जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक झाली. यावेळी त्यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. पाणी आमच्या हक्काचे अशी भूमिका घेत शेतकऱ्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. अखेर शेतकऱ्यांच्या या एकजुटीपुढे आणि तीव्र संघर्षामुळे प्रशासनाला नमते घ्यावे लागले, असे शेट्टी म्हणाले.

# लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आणि व्यवस्थापन



मागील बऱ्याच वर्षापासून कपाशीवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. लाल्या रोगामुळे कपाशीचे उत्पन्न जवळजवळ २० ते २५ टक्क्यांनी घटते. लाल्या रोग प्रामुख्याने जमिनीमध्ये असलेल्या मॅग्नेशियम आणि जस्त या सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे होतो किंवा त्याला अन्य कारणेही आहेत जसे पिकाची फेरपालट न करणे, शेतात पाण्याचा निचरा व्यवस्थित न होणे, हलक्या किंवा मुरमाड जमिनीत पिकाची लागवड करणे, रसशोषक किडींचा प्रादुर्भाव इत्यादी. लाल पाने हा एक कपाशी पिकातील विकार असून प्रामुख्याने जास्त उत्पादन देणाऱ्या कपाशीमधे आढळून येतो. झाडाच्या पानातील हरितद्रव्य प्रकाशाच्या सहाय्याने अन्न तयार करून आंतरप्रक्रियेने ते झाडाच्या विविध भागात पोहचवल्या जाते. झाडाच्या अन्न तयार करण्याच्या व आंतरप्रक्रियेने ते झाडाच्या विविध भागात पोहोचवण्याच्या नैसर्गिक क्रियेमधे विविध कारणांमुळे बाधा उत्पन्न होऊन पानातील हरित द्रव्याचे प्रमाण कमी हाते व त्याची जागा ॲन्थोसायनीन हे रंग द्रव्य घेते आणि या द्रव्यामुळेच पानाला लाल रंग येतो.

करावयाच्या उपाय योजना :शेतकरी बांधवानी लवकरात लवकर पिकाला खतमात्रा द्यावी. शेतात पाणी साचल्यास त्वरित चर काढून साचलेले पाणी बाहेर काढावे. १३:००:४५ किंवा १९:१९:१९ चे ५ ग्रॅम/लिटर किंवा नॅनो युरीयाची ४ मिली/लिटर प्रमाण घेऊन फवारणी करावी. मॅग्नेशियम ची कमतरता दूर करण्यासाठी १ टक्का मॅग्नेशियम सल्फेटची फवारणी करावी. कपाशीला बोंडे भरणे, पाते लागणे यासारख्या वाढीच्या महत्त्वाच्या अवस्थेत दोन ते तीन वेळेस दोन टक्के युरिया किंवा डीएपीची फवारणी करावी. कपाशीवर मावा तुडतुडे, फुलकिडे यांचा प्रभाव दिसत असेल तर त्यांच्या नियंत्रणासाठी २० मिली फिप्रोनील, किंवा १० मिली इमिडाक्लोप्रिड किंवा २० मिली बुप्रोफेझिन(२५ एस सी ) प्रति १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

आकस्मिक मर रोगाची लक्षणे दिसल्यास उपाययोजना : दीड किलो युरिया + दीड किलो पोटॅश १०० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी त्या नंतर ८ ते १० दिवसांनी २ किलों डी ए पी १०० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण ५० ते १०० मिली झाडाजवळ द्यावे किंवा कॉपर ऑक्सिक्लोराइड २.५ ग्रॅम + युरिया १० ग्रॅम प्रति लिटर हे प्रमाण घेऊन फवारणी करावी.

# शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि उपाय

शेळीपालन व्यवसायाचा विचार केला तर प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु शेळ्यापासून मिळणारे मांस उत्पादन हे शेळ्यांच्या वजनावर अवलंबून असते. परंतु बऱ्याचदा काही कारणांमुळे शेळ्यांचे वजन कमी होते किंवा वाढत नाही व त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो.

शेळ्यांचे वजन कमी होण्याच्या कारणांवर अशी करा मात :

शेळ्यांमध्ये बऱ्याच प्रकारचे रोग उद्भवतात व त्यामुळे वजनावर विपरीत परिणाम होतो. दुसरे कारण म्हणजे जेव्हा कळपात शेळ्या राहतात तेव्हा चाऱ्यासाठी एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण होते, ही बाब देखील शेळ्यांच्या शरीराचे वजन कमी करण्यास कारणीभूत आहे. कळपामध्ये ज्या शेळ्या थोड्या दुर्बल किंवा विनम्र असतात अशा शेळयांचे वजन कमी होते. साहाजिकच कळपातील मजबूत आणि मोठ्या शेळ्या कमकुवत शेळ्यांच्या अन्न आणि जागेवर अधिकचा हक्क सांगतात व आहारात प्रवेश नाकारला जात असल्याने कमकुवत शेळ्यांना चारा व्यवस्थित मिळत नाही व शेळ्यांचे वजन घटते. या समस्येवर उपाय म्हणून शेळ्यांचे व तसेच त्यांच्या जाती व शारीरिक स्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे नेहमीच योग्य असते. जर शेळ्यांमध्ये दातांची समस्या असेल तर यामुळे देखील वजन कमी होऊ शकते. दातांच्या समस्या मुळे चारा खाण्याच्या आणि गिळण्याच्या सामान्य प्रक्रियेवर विपरीत परिणाम



होतो. यामुळे शेळ्यांना पुरेशा चाऱ्यापासून वंचित राहावे लागते. या समस्येवर उपाय म्हणून वजन कमी करण्याच्या तपासणीमध्ये दात परिक्षण करून घेणे महत्त्वाचे असते. दातांची समस्या ही विविध प्रकारच्या खनिजांची कमतरता किंवा फ्लोरोसिसच्या अतिरेकामुळे होत असते. हार्ड स्टेनिंग हार्ड ड्राफ्टिंग, जबडा सुजणे हे देखील वजन कमी होण्याची प्रमुख कारणे आहेत. या समस्येचे निदान करायचे असेल तर शेळयांच्या तोंडाची तपासणी वेळोवेळी करावी. काही सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता जसे कॉपर, कोबाल्ट आणि सेलेनियम या आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेमुळे किंवा असंतुलनामुळे देखील शेळ्यांमध्ये वजन कमी होऊ शकते. कोबाल्टची कमतरता असली तर शरीराच्या वजनात वाढ होणे थांबते. सेलेनियम हे मेंढी पालन आणि शेळीपालन मध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या कमतरतेमुळे मादी प्राण्यांमध्ये गर्भपात आणि प्रजनन संस्थेचे समस्या वाढते. याच्या कमतरतेमुळे कोकरांची कमकुवत वाढ होते व विकास देखील थांबतो. एवढेच नाही तर कोकरामध्ये अचानक मृत्यूचे समस्या देखील दिसून येते. या समस्येला श्वेत स्नायू रोग म्हणतात. या समस्येवर उपाय म्हणून जनावरांना खनिज मिश्रण पावडर दिले गेले पाहिजे. जोन्स रोग मेंढी आणि शेळ्यांमधील जुनाट आजार आहे व हा वजन कमी करण्यासाठी कारणीभूत ठरतो. यामध्ये खाद्य योग्य प्रमाणात खाल्ले तरीही प्रादुर्भावित प्राण्याच्या जबड्यात खाली पाणी जमा होते, अशक्तपणा येतो तसेच मेंढ्यांमध्ये लोकर कमी होते, हगवन इत्यादी लक्षणे दिसतात. शेळ्यांच्या पायाला लंगडेपणा असणे हीदेखील एक समस्या असून हा रोग एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्यांमध्ये पसरतो व वजन कमी करत असतो. वरील दोन्ही कारणांसाठी पशुवैद्याच्या सल्ल्याने शेळ्यांना योग्य उपचार करावेत.

# मेथी लागवड माहिती तंत्रज्ञान

दैनंदिन आहारामध्ये मेथी या पालेभाजीचा वापर तुम्ही केलाच असेल. मेथी पिक हे कमी खर्चात जास्त उत्पन्न देणारे पीक आहे. मेथी हे पालेभाज्यातील महाराष्ट्रातील लोकप्रिय पालेभाजी आहे. दैनंदिन आहारात मेथीचा वापर आपल्या शरीरासाठी उपयुक्त ठरतो. त्यामुळे या पिकाला वर्षभर चांगली मागणी असते. या पिकाची लागवड करून चांगला नफा मिळवता येतो.


जमीनीची निवड : मेथी हे कमी कालावधीचे पीक आहे. त्यामुळे योग्य जमिनीची निवड आवश्यक आहे. मेथी पिकाच्या लागवडीसाठी मध्यम ते काळी आणि पाण्याचा योग्य जमीन लागते. चुनखडीच्या तसेच पाणी साठून राहणाऱ्या जमिनीत मेथी पीक चांगले येत नाही.

लागवडीचा हंगाम : मेथी या पिकाची लागवड वर्षभर करता येते. पावसाळ्यात, उन्हाळ्यात आणि थंडीच्या सुरुवातीलाही मेथी पिकाची लागवड करता येते आणि या काळात लागवड केलेल्या मेथीला बाजारभाव पण योग्य मिळतो. भाजीचा सतत पुरवठा होत राहावा यासाठी टप्प्या-टप्याने मेथी पिकाची लागवड करून वर्षभर मेथी पिकाची उपलब्धता करता येऊ शकते.

जमिनीची मशागत : लागवड करण्याआधी जमिनीची चांगली आडवी उभी नांगरट करून घ्यावी. नांगरणी नंतर रोटरच्या मदतीने जमीन भुसभुशीत करून घ्यावी.

लागवड अंतर : मेथी या पिकाची दोन प्रकारे लागवड करता येते.

मुख्य पीक म्हणून आणि आंतरपीक म्हणून. मुख्य पीक म्हणून लागवड करायची असल्यास तीन मिटर बाय दोन मीटर च्या सपाट वाफ्यामध्ये



लागवड करतात. दोन ओळींमध्ये पंधरा ते वीस सेंटीमीटर चे अंतर ठेवून मेथीचे बी फेकून लागवड करतात. तसेच आंतरपीक म्हणून मेथी पिकाची लागवड करायची असल्यास मुख्य पिकातील मोकळ्या जागेत असणाऱ्या वीस ते तीन सेंटीमीटर जागेत लागवड करतात.

बियाणांचे प्रमाण आणि बीजप्रक्रिया : मेथी पिकाच्या मुख्य पीक म्हणून एक हेक्टर लागवडीसाठी पंचवीस ते तीन किलो बियाणे लागते. तसेच आंतरपीक घेताना आवश्यकतेनुसार बियाण्यांचे प्रमाण घ्यावे. बियाणे पेरताना एकसारखे आणि पातळ सोडावे. बिजप्रक्रिया करताना बुरशीनाशक ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बियाण्यास चोळावे.

सुधारित जाती : फुले कस्तुरी : फुले कस्तुरी हे वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे संशोधित करण्यात आले आहे. या वाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे या वाणाला जास्त फुटवे असतात आणि जास्त उत्पादन क्षमता आहे. हे वाण मर आणि नागअलीळा प्रतिकूल वाण आहे. या मेथीची उगवण लागवड केल्यावर सात ते आठ दिवसात होते. कस्तुरी सिलेक्शन : कस्तुरी सिलेक्शन हे वाण भारतीय कृषी संशोधन संस्था नवी दिल्ली येथे संशोधित करण्यात आले आहे. हे वाण खायला चविष्ट असते. या वाणाची पाने गोलाकार आणि हिरवी असतात. या वाणाची रोपे लहान आणि नाजूक असल्याने या वाणाला बाजारात चांगली मागणी असते. या मेथीची उगवण लागवड केल्यावर तीन ते चार दिवसात होते.

आंतर मशागत : कमी कालावधीचे पीक असल्याने मेथी पिकामध्ये जास्त आंतरमशागतीची गरज नसते. तण व्यवस्थापन करणे आवश्यक असते. लागवडीनंतर पंधरा ते वीस दिवसाच्या नंतर खुरपणी करून घ्यावी. मेथी पिकामध्ये तण वाढू देऊ नये.

खते आणि फवारणी : मेथी पिकाला सुरुवातीला २० किलो नत्र आणि नंतर खुरपणी झाल्यानंतर २० किलो नत्र हेक्टरी या प्रमाणात द्यावे. यामुळे पिकाची वाढ जोमदार होते. तसेच पेरणीनंतर वीस ते पंचवीस दिवसांनी दहा लिटर पाण्यात २०० ग्रॅम युरिया मिसळून त्याची फवारणी करावी .यामुळे उत्पादनात वाढ होते. मेथी या पिकावर जास्त रोगांचा पादुर्भाव होत नाही. या पिकावर प्रामुख्याने पाने खाणारी अळी (लीप मायनर) आणि मावा या किडींचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळतो. मावा किड काळ्या रंगाची असते. मावा कीड पानाच्या खालच्या भागावर आणि शेंड्यावरून मोठ्या प्रमाणात पानातील रस शोषून घेते. त्यामुळे रोपे खराब होऊन रोपांची प्रत खराब होते. पाने खाणारी ही पानावरील रस शोषून घेत वेडीवाकडी पुढे पुढे जाते. त्यामुळे पानावर पांढरया रंगाच्या वेड्यावाकड्या रेषा दिसतात आणि रोपाची प्रत खराब होते. किडीच्या नियंत्रणासाठी पीक लहान अवस्थेत असताना पिकावर निंबोळी अर्काची आणि डायमियोट ची फवारणी करावी.

पाणी व्यवस्थापन : मेथी पिकाला नियमित पाणी द्यावे . मेथी पिकाला पाण्याची जास्त आवश्यकता असते. मेथीचे चांगले उत्पन्न घेण्यासाठी आणि भाजीच्या दर्जेदार कॉलिटी साठी मेथी पिकाला चार ते पाच दिवसांनी पाणी द्यावे. मेथी पिकाला पाण्याचा ताण पडू देऊ नये. पिकाला पाण्याचा ताण पडल्यास पिकाची वाढ कमी होऊन उत्पादनावर परिणाम होतो. मेथी या पिकाचे योग्य नियोजन केले तर या पिकातून योग्य नफा मिळवता येतो.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१८३७ : व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी
१८४० : सॅम्युअल मोर्स यांना टेलिग्राफ चा पेटंट मिळाला.
१८६३ : वेस्ट व्हर्जिनिया अमेरिकेचे ३५ वे राज्य बनले.
१८७७ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरवात केली.
१८८७ : देशातील सर्वाधिक गर्दीचे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे नाव सी. एस. टी.) सुरू झाले.
१८९९ : केंब्रिज विद्यापीठाच्या 'ट्रायपॉस' या गणिताच्या अंतिम परीक्षेत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिल्या वर्गात पहिले आल्यामुळे त्यांना सिनिअर रँग्लर होण्याचा बहुमान मिळाला.
१९२१ : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना
१९६० : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना
१९९० : ७.४ मेगावॅटचा भूकंपात इराण मध्ये ५०,००० लोक ठार तर १,५०,००० पर्यंत जखमी झाले.
१९९७ : 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे राज्यातील पहिली मुलींची सैनिकी शाळा पुण्याजवळ सुरू झाली.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झाले.
२०१४ : प्रसिद्ध कवी केदारनाथ सिंह यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : प्रसिद्ध ब्रिटीश व्यापारी व राजकारणी सर एडवर्ड अल्बर्ट ससून यांचा जन्मदिन.
१८६९ : लक्ष्मणराव किर्लोस्कर  किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९५६)
१८७६ : भारतीय तेलगु भाषिक चित्रपट क्षेत्राच्या इतिहासातील प्रसिद्ध पहिले गीतकार चांदला केसावदासू यांचा जन्मदिन.
१९१५ : टेरेन्स यंग  चिनी-इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९४)
१९२० : मनमोहन अधिकारी  लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान, कम्युनिस्ट नेते (मृत्यू: २६ एप्रिल १९९९)
१९३९ : रमाकांत देसाई  जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (मृत्यू: २८ एप्रिल १९९८)
१९४८ : नौरूचे राष्ट्राध्यक्ष लुडविग स्कॉटी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय लेखक आणि कवी विक्रम सेठ यांचा जन्म.
१९५४ : ॲलन लॅम्ब  इंग्लिश क्रिकेटपटू
१९७२ : पारस म्हांब्रे  क्रिकेटपटू
१९७६ : प्रसिद्ध भारतीय महिला कसोटी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू देविका पळशीकर यांचा जन्मदिन.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६८ : हेन्रिच रॉथ  जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (जन्म: १८ डिसेंबर १६२०)
१८३७ : विल्यम (चौथा)  इंग्लंडचा राजा (जन्म: २१ ऑगस्ट १७६५)
१९१७ : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जेम्समेसन क्राफ्ट्स यांचे निधन.
१९३० : ब्रिटीश कालीन रामपूर रियासतचे नवाब हमीद अली खान बहादूर यांचे निधन.
१९७२ : साली प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ प्रा. कोट्टरलाकोटा रंगधामा राव यांचे निधन.
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक पद्मभूषण डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)
१९९७ : बासू भट्टाचार्य  चित्रफट दिग्दर्शनाच्या पदार्पणातच राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १९३४)
१९९७ : वासुदेव वामन तथा 'भाऊसाहेब' पाटणकर ऊर्फ 'जिंदादिल'  मराठीतले पहिले शायर (जन्म: ? ? १९०८)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय बंगाली चित्रपट अभिनेत्री अनिता गुहा यांचे निधन.
२००८ : चंद्रकांत गोखले  अभिनेते (जन्म: ७ जानेवारी १९२१)
२००९ : पाकिस्तान देशाचे कीटकशास्त्रज्ञ, प्राध्यापक, अभिनेते आणि उद्योजक दतुक रहमान अन्वर सय्यद यांचे निधन.
२०१० : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुंडीबाईल रामा सुंदराम यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार डिकी रुतनागुर यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १९३१)
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)

# आधुनिक पद्धतीने भुईमूग लागवड; एकरी विक्रमी १७ क्विंटल उत्पादन!

पुणे : शेती करताना शेतकरी प्रामुख्याने अधिक बाजारभाव मिळवून देणारी पिके घेण्याकडे ओढले जात आहे. त्यातच तेलबिया पिकांना पाहिजे तसा भाव मिळत नसल्याने अनेक शेतकरी भुईमूग, सोयाबीन या पिकांपासून दुरावले जात आहे. मात्र, अशातही काही शेतकरी हे तेलबिया पिकांचे भरघोस उत्पादन घेत आहे. आज आपण अशाच एका भुईमूग उत्पादक शेतकऱ्याची यशोगाथा पाहणार आहोत. ज्यांनी भर उन्हाळ्यात भुईमूग पिकाची लागवड करून, त्यातून त्यांनी एकरी विक्रमी १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन घेतले आहे. अंकित भोयर असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते चंद्रपूर राजुरा तालुक्यातील पाचगाव येथील रहिवासी आहे. सध्याच्या घडीला शेतकरी तेलबिया पिकांची प्रामुख्याने पद्धतीने लागवड करतात. मात्र, प्रगतिशील शेतकरी अंकित भोयर यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी एक एकर शेतात आधुनिक पद्धतीने भुईमूग पिकाची लागवड केली. विशेष म्हणजे त्यांना भर उन्हाळ्यात विक्रमी उत्पादन देखील मिळाले आहे.

किती मिळाले उत्पादन?

सामान्यपणे भुईमूग तीन महिन्यांचे उन्हाळी पीक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर करून भुईमूग पीक घेतले तर त्याला कमी खर्च येतो. आणि उत्पादनही चांगले होते. असे शेतकरी अंकित भोयर सांगतात. त्यांना यंदा एका एकरात १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन मिळाले आहे. ज्यास सध्या बाजारात सहा हजार रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला आहे. ज्यामुळे कमी उत्पन्न मिळणाऱ्या भुईमूग पिकातून त्यांनी नियोजनपूर्वक आर्थिक प्रगती साधली आहे.

# अनैतिक संबंधाच्या संशयातून राजमहल टॉकीज परिसरात तरुणाचा खून

## १८ वर्षीय तरुण पोलिसांच्या ताब्यात




जालना। प्रतिनिधी

धारदार शस्त्राने वार करुन एका तरुणाचा खून करण्यात आल्याची घटना जालना शहरातील राजमहल टॉकीज परिसरात १३ जून रोजी घडली होती. या घटनेच्या दिवशी सदर बाजार पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले होते. त्याची सखोल चौकशी केली असता जुना वाद व अनैतिक संबंधाच्या संशयातून हा खून केल्याची कबूली आरोपीकडून मिळाली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी खून करण्यासाठी आरोपीने वापरलेले धारदार शस्त्र जप्त केले आहे. रफीक कासीम शेख (टट्टूपुरा,जालना) असे मृताचे नाव आहे. तर काशाफ खान फेरोज खान (१८, नादी कॉलनी, बावन एकर जालना)असे खून करणाऱ्या संशयित आरोपीचे नाव आहे. मयत इसमरफीक कासीम शेख हा वाळूचा व्यवसाय करीत होता. त्याची हत्या झाल्यावर सदर बाजार पोलिसांनी पथके करुन तपास करुन आरोपी उघड केला. हा गुन्हा वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाजारचे पीआय संदीप भारती, उपनिरीक्षक सचिन सानप, जगन्नाथ जाधव, रामप्रसाद रंगे, धनंजय कावळे आदींनी हा खुनाचा गुन्हा उघडकेला आहे. दरम्यान, हत्यारे कोठून आणले, अजून कुणी यात आहे का, याचा तपास पोलिसांकडून केल्या जात आहे.

हत्या करण्यासाठी आरोपी हास्कुटीवरुन तोंडाला रुमाल बांधून आला होता. तो येत असतांना शहरतील सीसीटीव्हीत कैद झाला होता. पोलिसांनी या सीसीटीव्हीआधारे पहिल्या दिवशी त्याला ताब्यात घेतले होते. त्या आधारे त्याच चौकशी केली. सुरुवातील त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली. नंतर त्याने गुन्हा कबुल केला असून आरोपीकडून स्कुटी, धारदार शस्त्र असा मुद्देमाल जप्त केला आहे. शहरातील जागोजागी असलेल्या सिसीटीव्हींमुळे पोलिसांना तपासाला चांगलीच मदत होऊ लागली आहे. दुसरीकडे नाशिकमध्ये कन्नमवार पुलाच्या खाली सुटकेसमध्ये आढळलेल्या महिलेच्या मृतदेहाचे गूढ अखेर उकलले आहे. मृत महिलेचे नाव सुनीता विश्वकर्मा (३०) असून तिच्या प्रियकरानेच तिचा नाक व तोंड दाबून खून केल्याचे निष्पन्न झाले. गोपी गोसावी असे या संशयिताचे नाव आहे. आडगाव पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने ही कारवाई केली. वरिष्ठ निरीक्षक संजय पीसे यांनी याबाबत माहिती दिली. महिलेचे लग्न झालेले आहे. ती संशयित गोपी गोसावी याच्या सोबत लिव्ह इनमध्ये राहत होती. त्याचे ४ लग्न झाले आहे. घटनेच्या दिवशी त्यांचे काही तरी कारणाने वाद झाले. सुनीताचे नाक-तोंड दाबून तिला जीवे ठार मारले. घरातील सुटकेसमध्ये तिचा मृतदेह कोंबून भरला. मित्राच्या दुचाकीवर सुटकेस ठेवून कन्नमवार पुलाच्या खाली सुटकेस फेकून दिली. खून केल्यानंतर गोपीने भावाला फोन करुन घडलेला प्रकार सांगीतला होता मात्र, भावाने दारुच्या नशेत बोलत असावा म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र तीन दिवसांनतर प्रसारमाध्यम, वृत्तपत्रात सुटकेसमध्ये महिलेचा मृतदेह आढळल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. बातमी बघताच भावाच्या पायाखालची वाळू सरकली आणि थेट पोलिसांत धाव घेतली. पथकाने संशयिताला ताब्यात घेतले आहे.

# संभाजीनगरात भावा-बहिणीवर चाकूने हल्ला

## कॉलेज कॅम्पसमध्ये गुंडगिरी!, सिटी चौक पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

बी.ए. प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी बहिणीसह कॉलेजमध्ये गेलेल्या तरुणावर दोघांनी चाकू व धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात तरुणाच्या छाती, पाठीवर आणि गळ्याजवळ वार करण्यात आले. गंभीर जखमी झालेल्या तरुणावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना मंगळवारी (१६ जून) दुपारी १.३० ते २ वाजेच्या सुमारास हडको कॉर्नर परिसरातील महाविद्यालय परिसरात घडली. या प्रकरणी सिटी चौक ठाण्यात सुफियान पठाण व त्याचा एक साथीदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणात मुजाईद वाहिद कुरेशी (२४, रा. हर्सूल सावंगी) याच्या फिर्यादीनुसार, तो त्याची बहीण रश्मीन फातेमा कुरेशी (१९) हिच्यासोबत बी.ए. प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी कॉलेजमध्ये गेला होता. प्रवेश विभागातील कर्मचाऱ्यांची जेवणाची वेळ सुरू असल्याने त्यांना काही वेळ थांबण्यास सांगण्यात आले.

त्यामुळे दोघे ज्युनियर कॉलेजच्या गार्डनमध्ये बसले होते. गार्डनमध्ये बसलेल्या भावंडांजवळ दोन युवक आले व 'तुम्ही कोण आहात आणि येथे का बसला आहात?' अशी विचारणा त्यांनी केली. त्यावर मुजाईदने आपण बहीण-भाऊ असल्याचे सांगितले. संतापलेला आरोपी फिर्यादीला ''रुक तेरे को बताता' असे म्हणून कुणाला तरी फोन लावत शिवीगाळ करू लागला. त्याने जवळील चाकू काढून थेट छातीवर वार केला. हल्ल्यादरम्यान सुफियानसोबत असलेल्या त्याच्या साथीदाराने मुजाईदला पाठीमागून पकडून ठेवले. त्यानंतर त्याने धारदार वस्तूने पाठीवर वार करून गंभीर जखमी केले. तेव्हा मुजाईदला पाठीमागून पकडणारा साथीदार त्याच्या गळ्यावर वार कर असे म्हणाला. त्यानुसार सुफियान याने मुजाईदच्या गळ्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र मुजाईदने मान खाली घेतल्याने वार दाढीच्या भागावर लागला आणि मोठा अनर्थ टळला. हल्ल्यानंतर दोन्ही आरोपींनी रश्मिनला धक्का देत तेथून पळ काढला. हल्ल्यानंतर जखमी अवस्थेत पडलेल्या मुजाईदला तेथील दोन युवकांनी मदत केली. त्यांनी त्याला एका खासगी रुग्णालयात नेले. मात्र त्यांनी त्याला दाखल करून घेतले नाही. तेव्हा मुजाईदला त्याच्या भावांनी घाटी रुग्णालयात दाखल केले.

# सीना नदीपात्रातील अतिक्रमणाविरोधात नेप्ती ग्रामस्थ आक्रमक

## रास्ता रोको आंदोलन, ८ दिवसांत मोजणीचे प्रशासनाकडून आश्वासन



अहिल्यानगर। प्रतिनिधी

नेप्ती येथील चांदपीर वस्ती जामगाव नाला-सीना नदीपात्रात करण्यात आलेले कथित अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे, तसेच नदीपात्रात टाकलेली भर आणि अनधिकृत पूल (बंधारा) काढण्यात यावा या मागणीसाठी नेप्ती ग्रामस्थांनी गुरुवारी सकाळी ९ वाजता छत्रपती कॉलेज परिसरात आक्रमक पवित्रा घेत रास्ता रोको आंदोलन केले. पावसाळा तोंडावर असताना प्रशासनाच्या ढिम्म कारभाराविरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. ग्रामस्थांनी यापूर्वी तहसील कार्यालयाला दिलेल्या निवेदनात चांदपीर वस्ती परिसरातील सीना नदीवर काही व्यक्तींनी नदीपात्रात अतिक्रमण करून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवल्याचा आरोप केला होता. पावसाळ्यात नदीला पूर आल्यास शेजारील शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली होती. मात्र, प्रशासनाकडून वेळेत दखल न घेतली गेल्याने ग्रामस्थांना रस्त्यावर उतरावे लागले. या आंदोलनात माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, ग्रामपंचायत सदस्य विजय होळकर, माजी सरपंच संजय आसारामजपकर, शिवा होळकर, प्रताप कळसे सहभागी झाले होते.

या संदर्भात नेप्ती येथील मंडळ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला असता धक्कादायक बाब समोर आली आहे. जामगाव नाल्याच्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या प्रवाहाच्या उत्तर बाजूस गट क्रमांक २९५ लगत नदीपात्रात माती व रॅबिट वापरून सुमारे १६० ब्रासची भर टाकण्यात आल्याचे आढळून आले आहे. संबंधित अनधिकृत पुलाच्या बांधकामामुळे सीना नदीचा नैसर्गिक प्रवाह धोक्यात आला आहे. पावसाळा सुरू झाला असून कधीही पूर येऊ शकतो. त्यामुळे दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने हे अनधिकृत बांधकाम तात्काळ पाडावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. तहसीलदार अभिजीत वांढेकर यांनी स्वतः आंदोलनस्थळी धाव घेतली. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून, ''भूमी अभिलेख विभागामार्फत आठ दिवसांच्या आत मोजणी पूर्ण केली जाईल. तसेच नियमांनुसार अतिक्रमणावर कारवाई करून नदीपात्र मोकळे केले जाईल, असे लेखी आश्वासन दिले. प्रशासनाच्या या लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले.

# बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीवरील कारवाईमुळे एसटीच्या उत्पन्नात ४३ कोटी ८३ लाखांची वाढ



जालना। प्रतिनिधी

परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या सूचनेनुसार आणि तत्कालीन औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करत राज्यभरातील बसस्थानकांच्या २०० मीटर परिघातील अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्रीमती प्रियांका नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेला उल्लेखनीय यश मिळाले असून त्याचा थेट सकारात्मक परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर दिसून आला आहे. १ जून ते १५ जून २०२६ या कालावधीत एसटी महामंडळाचे एकूण वाहतूक उत्पन्न ४९५,कोटी ३४ लाख रुपये इतके झाले असून, मागील वर्षीच्या याच कालावधीतील ४५१, कोटी ५१ लाख रुपयांच्या तुलनेत ४३ कोटी ८३ लाख रुपयांची (९.७१ टक्के) वाढ नोंदविण्यात आली आहे. म्हणजे दररोज चे सरासरी उत्पन्न ३ कोटी रुपयांनी वाढले आहे.

या कालावधीत रायगड (२ कोटी १७ लाख), पुणे (५ कोटी ९७ लाख), सातारा (३ कोटी ४६ लाख), छत्रपती संभाजीनगर (२ कोटी ६६ लाख), अमरावती (१ कोटी ६० लाख) नांदेड (२ कोटी २७ लाख) या विभागांनी सर्वाधिक उत्पन्नवाढ नोंदवली.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीच्या प्रवासी संख्येवर आणि महसुलावर मोठा परिणाम होत होता. न्यायालयाच्या आदेशानुसार बसस्थानकापासून २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. परिवहन विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस आणि एसटी प्रशासन यांच्या संयुक्त कारवाईमुळे प्रवाशांचा एसटीकडे ओढा वाढला असून त्याचे प्रतिबिंब उत्पन्नवाढीत स्पष्टपणे दिसून येत आहे. सरनाईक यांनी पुढे सांगितले की, राज्यातील प्रत्येक बसस्थानक परिसर अवैध प्रवासी वाहतुकीपासून मुक्त करण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून, एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहतील. प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि कायदेशीर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य आहे.

# खताच्या पोत्यात माती; शेतकऱ्यांनी जिल्हाकचेरीत पोते फोडून केला भांडाफोड

धाराशिव। प्रतिनिधी

अणदूर परिसरातील शेतकऱ्यांनी रक्कम जमा करुन ओंकार कृषी सेवा केंद्रातून साडेतीनशे पोती खत खरेदी करुन थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. आवारातच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांसमोर पोते खाली उतरवत मातीमिश्रित खत असल्याची तक्रार केली. कच्चा पावतीवर पोत्यात माती विक्री केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी यावेळी केला. तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील ओंकार कृषी सेवा केंद्रातून बोगस खतांची विक्री होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी पूर्वीही केल्या होत्या. मात्र, कारवाई झाली नव्हती. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी बनावट खत विक्रीचा भंडाफोड करण्यासाठी गुरुवारी कृषी सेवा केंद्र चालकास ५०० पोते खताची मागणी केली. साडेतीनशे पोते खत खरेदी करुन तीन वाहनात पोती भरुन थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजकुमार मोरे यांच्या समोर शेतकरी सूरज बचाटे व सतिश बनसोडे यांनी काही खताची पोती खाली उतरुन फोडून त्यात कशाप्रकारे मातीचा भरणा केला असल्याचे दाखविले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी खत विक्रेते व उत्पादन कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात येईल असे शेतकऱ्यांना आश्वासन देत, दोन पथके नियुक्त केले. रात्री कृषी अधीक्षक कृषी अधिकारी व दोन पथके अणदूर येथे दाखल झाले. नळदुर्ग पोलिस व पथकाकडून कृषी सेवा केंद्राचा पंचनामा करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते. दुकानासमोर २० ते २५ शेतकरी होते ठाण मांडून ओंकार कृषी सेवा केंद्राच्या नळदुर्ग व अणदूर येथे प्रत्येकी एक शाखा आहे. अणदूर येथील कृषी सेवा केंद्रासमोर दिवसभर २० ते २५ शेतकरी ठिय्या मांडून होते. रात्री पोलिस व कृषी विभागाचे पथक पोहोचल्यानंतर नागरिकांची गर्दी वाढली होती.

# सीईओ घेणार शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा आढावा



जालना। प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा तसेच आगामी काळातील अंमलबजावणीबाबत आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवरीया तालुकानिहाय आढावा बैठका घेणार आहेत.या बैठकींचे आयोजन संबंधित पंचायत समिती कार्यालयांमध्ये करण्यात आले असून विविध विभागांच्या प्रमुखांची उपस्थिती राहणार आहे. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल योजना, स्वच्छ भारत मिशन, उमेद अभियान, जल जीवन मिशन, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, कृषी विभाग, मनरेगा आदी योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

तसेच गावांतील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विविध उपक्रम व कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजन करण्यात येणार आहे. दि. २३ जून : सकाळी ११ वाजता मंठा, दुपारी २ वाजता परतूर दि. २५ जून : अंबड व घनसावंगी दि. ३० जून : भोकरदन व जाफ्राबाद दि. ३ जुलै : जालना व बदनापूर सर्व बैठका संबंधित पंचायत समिती कार्यालयांमध्ये आयोजित करण्यात आल्या असून तालुकास्तरावरील सर्व विभाग प्रमुख , सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी आवश्यक माहितीसह उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

मंगळवार व शुक्रवार हे जिल्हास्तरावरील भेटीचे दिवस असल्याने संबंधित तालुक्यातील आढावा बैठक संपल्यानंतर नागरिकांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेता येणार आहे. तसेच जिल्हा स्तरावर दुसऱ्या दिवशीही नागरिकांना भेटण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. अशी माहिती

डॉ. कृष्णकांत कनवरीया, मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी दिली आहे.

# महावितरणला सौर कृषिपंपमध्ये देशात प्रथम स्थान मिळवून देणारे धनंजय औंढेकर मुंबईत संचालकपदी रुजू



छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

आपल्या कार्यकारी संचालकपदाच्या कार्यकाळात महावितरणला 'मागेल त्याला सौर कृषिपंप'मध्ये देशात प्रथम स्थान मिळवून देणारे धनंजय औंढेकर यांनी महावितरण कंपनीचे संचालक (संचालन) म्हणून गुरुवारी (१८ जून) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते कार्यकारी संचालक (वितरण/प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. औंढेकर गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत. नवनियुक्त संचालक (संचालन) धनंजय औंढेकर हे मूळचे औंढा नागनाथचे (जि. हिंगोली) रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी तसेच एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर, नवी दिल्ली येथून ॲडव्हान्स सर्टिफिकेट इन पॉवर डिस्ट्रीब्यूशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे.

संचालक औंढेकर हे १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून माजलगाव (जि.बीड) येथे रूजू झाले. सन २००६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. त्यानंतर २०१६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून अधीक्षक अभियंता तर २०१९ मध्ये पदोन्नतीने मुख्य अभियंता पदी निवड झाली. या विविध पदांवर औंढेकर यांनी बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, सोलापूर, कल्याण, मुंबई मुख्यालयात काम केले आहे. संचालक (संचालन) औंढेकर हे २०२४ पासून कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या या कार्यकाळात महावितरणने मागेल त्याला सौर कृषिपंपमध्ये देशात प्रथम स्थान मिळवले. एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याचा जागतिक विक्रम केल्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने जाहीर केले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावरील सौर प्रकल्पांमध्ये देशात द्वितीय स्थान पटकावले. या योजनेसाठी महावितरणने देशात सर्वप्रथम फेसलेस-पेपरलेस ही ऑनलाइन सुविधा सुरू केली. नवीन वीजजोडणी, ग्राहक नावात बदल आणि वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरीची प्रक्रिया सुरू केली. यामध्ये संचालक औंढेकर यांचे मोठे योगदान आहे. 'अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात सांघिक कामगिरीतून कंपनीला अधिक सक्षम, ग्राहकस्नेही व हरित ऊर्जेकडे नेण्यास आणखी प्राधान्य देण्यात येईल. नवीन वीजजोडणीची प्रक्रिया फेसलेस-पेपरलेस म्हणजे पूर्णतः ऑनलाईन करण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठा, दर्जेदार ग्राहकसेवा, वीज हानीमध्ये घट आणि महसूलवाढ हे मुख्य ध्येय आहे', असे महावितरणचे नवनियुक्त संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी सांगितले.

# राहात्यात विनयभंग करणाऱ्या आरोपीच्या घरावर बुलडोझर

राहाता। प्रतिनिधी

राहाता शहरात अल्पवयीन मुलीच्या विनयभंग प्रकरणामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असतानाच, प्रशासनाने आज एक मोठी आणि कडक कारवाई केली. पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी आक्रमक भूमिका घेतलेले भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिलेला शब्द अखेर पूर्ण झाला असून, प्रशासनाने संबंधित आरोपीच्या अनधिकृत बांधकामावर थेट बुलडोझर चालवला आहे.ही धक्कादायक घटना घडल्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांनी तातडीने पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले होते व न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. ''महिलांच्या सन्मानाशी खेळ करणाऱ्या नराधमांची गय केली जाणार नाही,'' असा कडक इशारा त्यांनी दिला होता. त्यानंतर पोलीस, महसूल आणि नगरपालिका प्रशासनाने संयुक्त मोहीम राबवून आरोपीच्या घरावर थेट हातोडा फिरवला.

या कारवाईमुळे राहाता शहरासह संपूर्ण तालुक्यात कायद्याचा धाक निर्माण झाला असून, महिलांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासन अत्यंत गंभीर असल्याचा कडक संदेश गेला आहे. गुन्हेगार कितीही मोठा असला तरी त्याला कायद्यापुढे झुकावेच लागेल, ही भूमिका या कारवाईतून स्पष्ट झाली आहे. प्रशासनाच्या या धाडसी पावलाचे राहाता परिसरातील नागरिकांनी जोरदार स्वागत केले असून, पीडित कुटुंबीयांनाही यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

# आ.सोळंकेच्या तालुक्यात अन् आ.पंडितांच्या मतदारसंघातील शाळेची भयान दुरावस्था!

## झाडाखाली भरतोय वर्ग, जीव धोक्यात घालून शिकतात विद्यार्थी

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील काळेगाव थडी केंद्र टाकरवण येथील जिल्हा परिषद शाळेची इमारत अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत पोहोचली असून विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून शिक्षण घ्यावे लागत आहे. इमारत कधीही कोसळण्याची शक्यता असल्याने सध्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे वर्ग झाडाखाली भरवले जात आहेत. त्यामुळे मायबाप सरकार माजलगावचे आमदार प्रकाशदादा सोळंके आणि गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी तातडीने निधी उपलब्ध करून या विद्यार्थ्यांवर उपकार




करावेत, अशी विनंती सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

सन १९६३ मध्ये विटा व चुन्यापासून उभारण्यात आलेली शाळेची इमारत आज मरणासन्न अवस्थेत आहे. भिंतींना मोठमोठे तडे गेले असून छतावरील पत्रे गंजून गळती होत आहे. सिमेंटचे खपले सतत कोसळत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय वर्गखोल्यांमध्ये साप-विंचू आढळण्याच्या घटनाही वारंवार घडत आहेत. या धोकादायक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना झाडाखाली बसवून शिक्षण द्यावे लागत असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब काकडे यांनी सांगितले. अनेक वेळा वरिष्ठ कार्यालयाकडे पाठपुरावा करूनही अद्याप नवीन इमारतीचे काम सुरू झालेले नाही. डॉ. गणेश ढवळे यांनी याप्रकरणी १३ एप्रिल रोजी जिल्हा परिषद बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांची भेट घेऊन शाळा इमारतीसाठी निधी मंजूर करण्याची मागणी केली होती. त्यानंतर सीईओ यांनी गटशिक्षणाधिकारी,

◀◀ पान ३ वर

# शेख राजुभाई यांची गेवराई शहर प्रमुखपदी निवड!

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्हा शिवसेना (उबाठा) कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात पक्षांतर्गत महत्त्वाच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली. शिवसेना विरोधी पक्षनेते आमदार अंबादासजी दानवे यांच्या हस्ते आणि बीड जिल्हा संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत शेख राजुभाई यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या गेवराई शहरप्रमुखपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे.

या महत्त्वपूर्ण निवडीच्या प्रसंगी शिवसेना (उबाठा) बीड जिल्हा प्रमुख उल्हास भैया गिराम आणि गेवराई तालुका प्रमुख अजय भैय्या दाभाडे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत शेख राजुभाई यांना नियुक्तीचे पत्र देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



या निवडीमुळे गेवराई शहरात पक्षाची ताकद अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी नेत्यांनी व्यक्त केला.या सोहळ्याला शिवसेना पक्षाचे अनेक प्रमुख पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने,रफीक बागवान, महेबुब शेख, मुस्तफा शेख,शरद ढवारे,मुजीब शाह

◀◀ पान ३ वर

# रस्त्यांवरील बॅनरबाजीला लगाम

## पो.नि.वैभव पाटील यांच्या टीमचे कौतुक

बीड । प्रतिनिधी

शहरातील रस्ते, चौक तसेच विद्युत खांबांवर बेकायदेशीरपणे बॅनर लावून अतिक्रमण करू नये, यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी शहरातील बॅनर लावणाऱ्या युवकांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या बैठकीत शहरातील चौक, रस्ते व इलेक्ट्रिक पोलवर कोणत्याही परिस्थितीत बॅनर, फ्लेक्स किंवा जाहिरातीचे फलक लावू नयेत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. अशा प्रकारचे बॅनर वाहतुकीस अडथळा निर्माण करण्याबरोबरच अपघातास कारणीभूत ठरू शकतात, याकडे उपस्थितांचे लक्ष वेधण्यात आले. तसेच, नगर परिषदेकडून आवश्यक परवानगी घेतल्याशिवाय कोणतेही बॅनर किंवा जाहिरात फलक उभारू नयेत, असे नियम समजावून सांगण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत बॅनर लावल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. शहरातील वाहतूक सुरळीत राहावी, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान टळावे आणि शहराचे सौंदर्य अबाधित राहावे, यासाठी नागरिकांनी व युवकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी केले.



# वाहतूक शाखेच्या दक्षतेमुळे चोरीची बुलेट सापडली

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे चोरीची रॉयल एनफिल्ड (बुलेट) मोटारसायकल हस्तगत करण्यात यश आले असून ती पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी संबंधित पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आली आहे.

बीड जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. वैभव पाटील व त्यांच्या पथकातील अंमलदार शहरात नियमित पेट्रोलिंग करत असताना त्यांना एक संशयास्पद बेवारस बुलेट मोटारसायकल आढळून



आली. वाहनाची सखोल पडताळणी केली असता सदर मोटारसायकल चोरीची असल्याचे निष्पन्न झाले.

तपासादरम्यान ही मोटारसायकल उरळी कांचन पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे समोर आले. या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ४०२/२०२४ अन्वये भा.न्या.सं. कलम ३(५) व ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल असून पुढील तपास उरळी कांचन पोलीस ठाण्याकडून सुरू आहे.

यामुळे जप्त करण्यात आलेली रॉयल एनफिल्ड (बुलेट) मोटारसायकल पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी बीड जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. वैभव पाटील यांनी उरळी कांचन पोलीस ठाण्याचे तपास अंमलदार पोलीस हवालदार श्री. सचिन मोरे यांच्याकडे मुद्देमाल हस्तांतरण ताबा पावती व सुपूर्दनाम्यासह रीतसर स्वाधीन केली. ही उल्लेखनीय कामगिरी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके तसेच अप्पर पोलीस अधीक्षक

◀◀ पान ३ वर

# सत्ताधारी व बोगस गुत्तेदारांच्या त्रासामुळे सीओ फडसे यांची बदली- तुतारी गटाचा आरोप



बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे साहेब यांची नांदेड येथे उपायुक्त पदी नियुक्ती झाली आहे, मुख्याधिकारी फडसे यांनी तातडीने बीड सोडले नांदेड येथे रुजू झाले आहे, राष्ट्रवादी तुतारी गटाच्या विनंतीवरून आज ते बीडमध्ये आले असता राष्ट्रवादी तुतारी गटाच्या सर्व नगरसेवकांच्या वतीने बीड येथील संग्राम रेस्टॉरंट हॉल मध्ये निरोप समारंभ आयोजन करण्यात आले होते, निरोप समारंभात बोलताना शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादीचे गटनेते खुर्शीद आलम म्हणाले की मुख्याधिकारी फडसे बीड नगरपरिषदेत आल्यापासून शिस्तीने कामे सुरू होते तसेच सतत सुधारणा होत होती लोकांच्या मुलभूत सुविधा सह विकास कामा संदर्भात मुख्याधिकारी साहेब विविध प्रकारच्या उपाययोजना करत होते, पडसे साहेब अजुन थोडे दिवस राहिले असते तर बीड शहराचा चेहरामोहरा बदलला असता पण सत्तेतील काही मोजक्या लोकांना आणि बोगस गुत्तेदारांना नियमानुसार काम करणारा मुख्याधिकारी परवडत नसल्याने त्यांनी सत्तेचा दुरुपयोग करून फडसेना बदलण्याचा घात रचला एवढेच नव्हे तर काहींना मुख्याधिकारी

◀◀ पान ३ वर

# माजी प्राचार्य ह.भ.प. त्रिंबक महाराज मातकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्याल येळंब घाट चे माजी प्राचार्य तसेच वारकरी संप्रदायातील आदरणीय व्यक्तिमत्त्व ह.भ.प. त्रिंबक महाराज मातकर यांचे आज पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

त्रिंबक महाराज मातकर हे मराठी विषयाचे गाढे अभ्यासक म्हणून ओळखले जात होते. त्यांनी येळंब घाट येथील माध्यमिक व



उच्च माध्यमिक महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत असताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळात शैक्षणिक गुणवत्ता

◀◀ पान ३ वर

# नागरिकांनी योग दिनात सहभागी होऊन आरोग्यदायी जीवनशैलीचा संकल्प करावा- जिल्हाधिकारी जॉन्सन

बीड । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दि.२१ जून रोजी जिल्हाभर विविध ठिकाणी सामूहिक योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम सकाळी ६.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे होणार आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने योगाचा संदेश घराघरात पोहोचवावा यासाठी योग दिनात सहभागी होऊन आरोग्यदायी जीवनशैलीचा संकल्प करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

योग दिनाच्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, उपशिक्षणाधिकारी देवकते, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसूरकर, सतीश राठोड आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावरही मोठ्या प्रमाणावर योग दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमात प्रशासनासोबत पतंजली योगपीठ, योगा असोसिएशन, विविध योग संघटना तसेच सामाजिक संस्था सक्रिय सहभाग घेणार आहेत. या कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, योग साधक, विद्यार्थी, युवक-युवती तसेच सर्वसामान्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा.

संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. भारताची हजारो वर्षांची योग परंपरा आज जगभर पोहोचली असून शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनासाठी योग महत्त्वपूर्ण ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर सकाळी ६.३० ते ८ वाजेदरम्यान सामूहिक योग प्रात्यक्षिके, जनजागृती उपक्रम आणि योगाचे महत्त्व पटवून देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

# हनुमंत जंजीरे यांच्या कन्येची यशस्वी भरारी; स्नेहलचे सीए परीक्षेत उज्वल यश

आष्टी । प्रतिनिधी

गोविंद उद्योग समूहाचे उद्योजक हनुमंत जंजीरे (दाजी) यांच्या कुटुंबासाठी अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण ठरला असून त्यांची कन्या कु. स्नेहल हनुमंत जंजीरे हिने मे २०२६ मध्ये झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट या अत्यंत प्रतिष्ठेच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी आपल्या अद्वैतचंद्र निवासस्थानी स्नेहल हिचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

जिद्द, कठोर परिश्रम, चिकाटी



आणि ध्येयाप्रती असलेल्या समर्पणाच्या बळावर स्नेहलने हे मानाचे यश प्राप्त केले आहे. आष्टी तालुक्यातील कुंभेफळ येथील स्वातंत्र्यसैनिक कै. भाऊसाहेब बाबुराव जंजीरे व रावसाहेब जंजीरे यांच्या प्रेरणादायी वारशातून लाभलेल्या संस्कारांच्या बळावर तिने यशाची ही उंच भरारी घेतली आहे. स्नेहलने आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुणे येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल, औंध येथे पूर्ण केले. त्यानंतर इंदिरा नॅशनल स्कूल अँड कॉलेज, पुणे येथे बारावी व पदवीचे शिक्षण घेत असतानाच सीए होण्याचे स्वप्न उराशी बाळगून तिने अथक परिश्रम सुरू ठेवले. अनेक आव्हाने, संघर्ष आणि कठीण टप्प्यांवर मात करत अखेर मे २०२६ मध्ये तिने चार्टर्ड अकाउंटंट ही प्रतिष्ठित पदवी प्राप्त करून आपल्या कुटुंबासह संपूर्ण परिसराचा गौरव वाढविला. या यशामागे वडील उद्योजक हनुमंत जंजीरे, आई सौ. सुरेखा जंजीरे, भाऊ सुहास जंजीरे (सिव्हिल इंजिनिअर) तसेच कुटुंबीयांचे मार्गदर्शन, सहकार्य आणि आशीर्वाद यांचा मोठा वाटा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यावेळी आमदार सुरेश धस यांच्या हस्ते स्नेहल हिचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह

◀◀ पान ३ वर

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी एकनाथ शिंदेंची शिवसेना कटिबद्ध : खासदार ज्योती वाघमारे

बीड । प्रतिनिधी

महिलांच्या प्रश्नांवर संवेदनशीलपणे काम करताना शिवसेनेची भूमिका तळागाळापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येक महिला पदाधिकाऱ्याने स्वीकारली पाहिजे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महिला शक्तीचे संघटन अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शिवसेना खासदार ज्योती वाघमारे यांनी केले शिवसेना महिला आघाडीच्या



वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवदुर्गा-शिवसंवाद दौऱ्याअंतर्गत केज, अंबाजोगाई व परळी विधानसभा मतदारसंघातील महिला सेनेचा संवाद मेळावा आंबेजोगाई येथील हॉटेल पियुष इन येथे गुरुवारी (दि.१८) उत्साहात पार पडला. यावेळी शिवसेना राष्ट्रीय प्रवक्त्या शायना एन.सी., उपनेत्या कला शिंदे, विजया पोटे व संगीता ठोंबरे, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आदी उपस्थित होते. या मेळाव्यात खासदार वाघमारे यांनी महिला पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करा. गावागावांतील महिलांशी थेट संपर्क वाढवून शिवसेनेची ताकद अधिक बळकट करण्यावर भर द्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

यावेळी महिला संपर्कप्रमुख संगीता चव्हाण, महिला जिल्हाप्रमुख डॉ. प्रतिभाताई थोरात, जिल्हा कार्याध्यक्ष आम्रपालीताई गजेशीव, परळी विधानसभा उपजिल्हाप्रमुख कल्याणीताई ऑटी, केज-आंबेजोगाई विधानसभा उपजिल्हाप्रमुख मीराताई आडे, उपजिल्हाप्रमुख फरजानाताई शेख, माजी उपसभापती


◀◀ पान ३ वर

# निसर्गाने भरभरून दिले, प्रशासनाने वाया घालवले!

## आष्टी तालुक्यावर पाणीटंचाईचे संकट; नियोजनशून्य कारभारामुळे प्रकल्प कोरडेठाक

आष्टी । प्रतिनिधी

गतवर्षी निसर्गाने आष्टी आणि पाटोदा तालुक्यावर अक्षरशः कृपावर्षाव केला. लघु आणि मध्यम प्रकल्प तुडुंब भरले, ओव्हरफ्लो झाले. तीन वर्षे पुरेल एवढा जलसाठा उपलब्ध असतानाही प्रशासनाच्या बेफिकिरीने आणि नियोजनशून्य कारभाराने आज आष्टी तालुक्यावर भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. त्यामुळे ''दुष्काळ निसर्गामुळे नव्हे, तर कारभारामुळे पडला,'' अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून



व्यक्त होत आहे.

तालुक्यातील सात मध्यम प्रकल्पांमध्ये केवळ ८.०१ टक्के तर ३३ लघु प्रकल्पांमध्ये अवघा ०.६४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तब्बल २९ प्रकल्प शून्यावर आले असून सहा मध्यम आणि तेवीस लघु प्रकल्प कोरडेठाक पडले आहेत. कडा, रुटी आणि तलवार प्रकल्पांची अवस्था दयनीय बनली आहे.

भरपूर पाऊस झाला, पण पाणी गेले कुठे?

मुबलक पाणी उपलब्ध असताना ते पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले नाही. बेकायदेशीर उपसा, बेसुमार वापर आणि महसूल व जलसंपदा विभागाच्या सुस्त कारभारामुळे लाखो घनमीटर पाणी वाऱ्यावर गेले. प्रशासनाने वेळेत कठोर पावले उचलली असती तर आज टँकरची वेळ आली नसती, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

◀◀ पान ३ वर

# अंशतः अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार- डॉ.नरेंद्र काळे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पदवीधर युवकांचे कोणतेही प्रश्न असोत, ते मार्गी लावण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील. वाढीव टप्पा अनुदानाच्या पुढील आंदोलनातही सक्रिय सहभाग घेऊन शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते मा. शरद पवार यांचे एकनिष्ठ समर्थक, शिक्षक नेते, राष्ट्रवादी पदवीधर संघटनेचे प्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबईचे अधिसभा सदस्य आदरणीय डॉ. नरेंद्र काळे यांनी विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांच्याशी बोलताना सांगितले. डॉ नरेंद्र काळे हे गुरूवार दि.१८ रोजी बीड शहरात आले होते. या वेळी जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांनी त्यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान डॉ काळे आणि जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांच्यात शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी, विनाअनुदानित शाळांचा अनुदानाचा प्रश्न तसेच राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना वाढीव टप्पा मिळण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26